मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी




■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : ११४ ■ गुरुवार, ०१ जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# नववर्षाची सुरुवात देवदर्शनानं

## मुंबईत भाविकांची गर्दी उसळणार; 'श्री सिद्धिविनायक'सह सर्वच मंदिरांमध्ये जबरदस्त नियोजन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** नवीन वर्षाची सुरुवात देवदर्शनानं करण्याची परंपरा अनेक भाविकांमध्ये रुजलेली आहे. यामुळे दरवर्षी 1 जानेवारीला पहाटेपासूनच मुंबईतील प्रमुख मंदिरांमध्ये भाविकांची प्रचंड गर्दी उसळते. यात श्री सिद्धिविनायक, महालक्ष्मी, मुंबादेवी आणि बाबूलनाथ मंदिरांचा विशेष समावेश असतो. या मंदिरांमध्ये दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या



दरवर्षी लाखोंच्या घरात पोहोचते. विशेषतः श्री सिद्धिविनायक मंदिरात नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी लाखो भाविकांच्या गर्दीचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

**मंदिर प्रशासनांकडून चोख व्यवस्था :** नववर्षाच्या पूर्वसंध्येला (31 डिसेंबर) आणि पहिल्या दिवशी (1 जानेवारी) मंदिरांमध्ये होणारी भाविकांची गर्दी लक्षात घेता मुंबईतील जवळपास सर्वच मंदिर प्रशासनांकडून योग्यपद्धतीनं पूर्व नियोजन करण्यात आलं आहे. मुंबईतील प्रत्येक मंदिरांमध्ये वर्षाच्या पहिल्या आणि शेवटच्या दिवशी भाविकांकडून मोठ्या प्रमाणावर गर्दी होणं स्वाभाविक आहे. मात्र, सध्या निवणुकांच्या काळात ही गर्दी दरवर्षीपेक्षा जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे वैद्यकीय सुविधा, रांगेत पिण्याचं पाणी, मोबाईल टॉयलेट्स, मंडप अश्या अनेक सुविधाही प्रमुख मंदिरांकडून पुरवण्यात आल्या आहेत.

**श्री सिद्धिविनायक न्यासाचं नियोजन :** प्रभादेवी येथील मुंबईचं आराध्य दैवत श्री सिद्धिविनायक गणपती मंदिरात नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी (1 जानेवारी 2026) लाखो भाविक दर्शनासाठी येण्याचा अंदाज आहे. यंदा 3 ते 4 लाख भाविकांच्या गर्दीची अपेक्षा असून, मंदिर न्यासाकडून भाविकांच्या सोयीसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

**विशेष पूजा सेवा बंद :** 1 जानेवारीला कोणतीही विशेष पूजा सेवा उपलब्ध राहणार नाही, जेणेकरून दर्शन रांगा सुलभपणे चालतील आणि खोळंबा टाळता येईल.

**विविध रांगांचं नियोजन:** गाभाऱ्यातून सर्वसामान्यांसाठी दर्शनाची रांग, महिलांसाठी स्वतंत्र विशेष रांग, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, गर्भवती महिलांना आणि नवजात बालकांसह येणाऱ्या भाविकांसाठी खास रांग, मुखदर्शन रांग अशा खास रांगाचं नियोजन करण्यात आलं आहे.

**प्रतीक्षा व्यवस्था:** मंदिराजवळील राजे शहाजी मैदानात मोठा प्रशस्त तंबू उभारण्यात आला आहे, ज्यात एकावेळी सुमारे 10 हजार भाविक थांबू शकतील.

---

# श्रीमती भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयाचे चौदावे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरे

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या द्रोणागिरी विभागातील श्रीमती भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयाचे 14 वे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात मान्यवरांच्या उपस्थितीत दि.30 डिसेंबर रोजी पार पडले. अल्पावधीत नावारूपाला आलेल्या या विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन विद्यार्थ्यांच्या उत्साहात आणि जोमात पार पडले. दिग्गज कलावंतांना मानवंदना अर्पण करत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या वेशभूषा करत नृत्य सादर केले. या वार्षिक स्नेहसंमेलनात पूर्व प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांनी, प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांनी तसेच उच्च प्राथमिकच्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे नृत्य सादर केले. तसेच या कार्यक्रमातून विविध संस्कृतीने नटलेला भारत याबद्दल देखील संदेश दिला. याप्रसंगी मान्यवरांच्या उपस्थितीत विविध क्षेत्रात प्राविण्य संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. बक्षीस वितरण समारंभात देखील मान्यवरांच्या हस्ते अगदी पूर्व प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांपासून ते उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांपर्यंत सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. तसेच वार्षिक बक्षीस वितरण सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना व उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच कार्यक्रमाप्रसंगी शिक्षण प्रसारक माजी खासदार लोकनेते माननीय रामशेठ ठाकूर साहेबांच्या जीवनावर आधारित छोटी नाटिका देखील विद्यार्थ्यांनी सादर करत लोकनेते रामशेठ ठाकूर साहेबांना त्यांच्या 75 व्या वाढदिवसानिमित्त नाटिकेद्वारे शुभेच्छा दिल्या. भारावून टाकतील असे नृत्य सादर करत सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात कार्यक्रमाची शोभा वाढवली वार्षिक स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा एक मंच. आणि अशा या मंचावर विद्यार्थ्यांनी आपली




कला सादर करत सर्व पालकांचे तसेच मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाप्रसंगी सौ. स्नेहल पाटील यांनी वार्षिक स्नेहसंमेलनाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन करत मान्यवरांचे तसेच यशस्वी विद्यार्थ्यांचे शाब्दिक स्वागत केले.याप्रसंगी असिस्टंट कमिशनर ऑफ पोलीस माननीय श्री.किशोर गायके, सीनियर पोलीस इन्स्पेक्टर श्री. जोशी, व्हॉइस चेअरमन जे. बी. एस. पी. संस्था माननीय श्री. वाय. टी. देशमुख, एडवोकेट माननीय श्री. राहुल घरत, श्री. शेखर तांडेल, श्री.मेघनाथ तांडेल, श्री.सुनील पाटील, श्री सुरेश पाटील, सौ. सीमा घरत,एम एन एम वीद्यालयाचे चेयरमैन श्री भार्गव ठाकूर प्राचार्या सौ सायली वडवलकर ,रामशेठ ठाकूर कॉलेज खारघर च्या प्राचार्या सौ निशा नायर , सौ माधुरी प्रभू व सौ शमा म्हात्रे आदि मान्यवर उपस्थित होते. या भव्य दिव्य कार्यक्रमाप्रसंगी विद्यालयाचे चेअरमन माननीय श्री.चंद्रकांत घरत विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.अनुराधा काठे यांनी सर्व मान्यवरांचे, तसेच उपस्थित सर्व शिक्षक पालक प्रतिनिधींचे, सर्व विद्यार्थ्यांचे, सर्व पालकांचे, आभार मानत सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यालयाचे चेअरमन माननीय श्री. चंद्रकांत घरत, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.अनुराधा काठे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने विद्यालयाचे 14 वे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले.

## एसटी बसस्थानक स्वच्छतेसाठी दर १५ दिवसांनी विशेष मोहीम

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व बसस्थानकांवर, बसस्थानक परिसरात तसेच प्रशासकीय इमारतींमध्ये दर १५ दिवसांनी सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रवाशांना अधिक स्वच्छ, सुरक्षित व आरोग्यदायी सुविधा मिळाव्यात तसेच एसटीची सकारात्मक प्रतिमा अधिक बळकट व्हावी, या उद्देशाने हा महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू करण्यात येत आहे.

या मोहिमेंतर्गत बसस्थानकातील बैठक व्यवस्था, फरशी, भिंती, काच, शौचालये, पिण्याच्या पाण्याची ठिकाणे, महिला विश्रांतीगृहे, कार्यालयीन कक्ष आदींची सखोल स्वच्छता करण्यात येणार आहे. साचलेला कचरा, अनावश्यक झाडे-झुडपे, जाहिरातींचे फलक, जाळी-जळमट यांचे निर्मूलन करून परिसर अधिक स्वच्छ, सुंदर व नीटनेटका केला जाणार आहे. कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र डबे उपलब्ध करून कचऱ्याचे योग्य प्रकारे वर्गीकरण व विल्हेवाट लावली जाणार असून प्रवासी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्यात येणार आहे. पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणी स्वच्छता व नियमित देखभाल ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.या अभियानासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक संस्था, विद्यार्थी, नागरिक तसेच एसटीचे अधिकारी व कर्मचारी यांच्या सहभागातून ही मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.

---

# शेकाप–महाविकास आघाडीच्या रिचा गौरव पोरवाल निवडणूक रिंगणात

## प्रभाग क्र. १२ (क) मधून उमेदवारी अर्ज दाखल

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्ष–महाविकास आघाडीच्या वतीने रिचा गौरव पोरवाल यांनी प्रभाग क्रमांक १२ (क) मधून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. रिचा ताई या सर्व क्षेत्रातील कामगारांचे भक्कम नेतृत्व असणारे समाजसेवक ,शेकापचे कामोठे शहराचे कार्याध्यक्ष गौरव पोरवाल यांच्या त्या धर्मपत्नी असून, सामाजिक व जनहिताच्या कार्यातून त्यांनी प्रभागात आपली एक स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

मराठी संस्कृती, लाल बावटा विचारसरणी आणि सर्वसमावेशक सामाजिक बांधिलकी जपणारे पोरवाल कुटुंब हे यंदा महाविकास आघाडीचे नेते, माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या अनेक वर्षांपासून नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. विकासकामांतील गुणवत्ता, पारदर्शकता व प्रशासनाच्या जबाबदारीवर प्रश्न उपस्थित करत सत्ताधाऱ्यांना जाब विचारण्याची निर्भीड भूमिका या दांपत्याने कायम ठेवलेली , लोकप्रतिनिधी प्रमाणे नागरिकांच्या तक्रारी यशस्वीरीत्या मार्गी लावल्याने अल्पावधी काळातच त्यांनी प्रभागातील



जनतेचा मोठा विश्वास संपादन केला आहे.

रिचा ताई पोरवाल यांनी सामाजीक कार्य करताना महिला सक्षमीकरण, बचत गट,कामगार युनियनच्या माध्यमातून हजारो गरजूंना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्याने त्यांच्या पाठीशी मोठा कामगार वर्ग उपस्थित असलेला पहायला मिळाला.सफाई,स्वच्छता दूत, घरकामगार, सुरक्षा रक्षक व अन्य असंघटित कामगारांचे नेतृत्व स्वीकारत त्यांच्या हक्कांसाठी प्रभावी लढा त्यांनी अनेकदा उभारलेला आहे. विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि सार्वजनिक कार्यक्रमांतून कामगारांचा सन्मान, ध्वजारोहण व सत्कार सोहळे आयोजित करून त्यांना प्रतिष्ठा मिळवून देण्यात त्या यशस्वी ठरल्या आहेत.

मराठी–अमराठी असा कोणताही भेदभाव न करता सर्वधर्मीय सण-उत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून कामोठे परिसरात सामाजिक सलोखा जपण्याचे कार्य केले. मुंबई ते दिल्लीपर्यंत विविध प्रशासकीय कार्यालयांमध्ये त्यांनी प्रभावी पाठपुरावा करून प्रलंबित योजना ,अडचणी वर मात करीत अन्यायकारक धोरणांविरोधात संघर्ष केल्याने शेकडो कामगारांचा मोठा वर्ग त्यांच्या निवडणूकित सक्रिय सहभाग घेताना दिसत आहे.

जन्म, मृत्यू यांसारख्या प्रसंगी नागरिकांच्या पाठीशी आधारवड म्हणून उभे राहण्याची भूमिका रिचा ताई यांनी कायम जपल्याने प्रभागातील जनतेमध्ये पोरवाल परिवारा प्रति आपुलकीची भावना अधिक दृढ झाली असल्याचे प्रचारादरम्यान दिसून येत आहे. मूलभूत सुविधांपासून आधुनिक विकासापर्यंत सर्वसमावेशक विकासाचा ध्यास घेऊन यंदाची निवडणूक ही भ्रष्ट व्यवस्था आणि प्रस्थापितांविरोधातील विस्थापितांची लढाई ठरेल, असा विश्वास त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केला जात आहे.

सार्वजनिक जीवनातील सक्रिय सहभाग, सामाजिक बांधिलकी आणि संघर्षशील कार्यपद्धतीमुळे प्रभाग १२ (क) मधील उमेदवारी ही पक्षाकडून मिळालेली मोठी जबाबदारी असल्याचे मानले जात आहे. या जवाबदारी साठी पोरवाल कुटुंबांनी पक्ष श्रेष्ठींचे आभार मानले. कामोठेकर जनतेने ही निवडणूक मनावर घेतल्याने शेकाप–महाविकास आघाडीच्या रिचा गौरव पोरवाल यांचा विजय निश्चित असल्याचे मत नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## विकास महाविद्यालयाच्या एन.एस.एस. च्या विद्यार्थ्यांनी

# वांगणी येथील गणेश घाट आणि कडव पाडा येथे वनराई बंधारे बांधले

**दैनिक युवक आधार**

**मुंबई वार्ताहर :** विक्रोळी येथील विकास कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे यंदाचे ७ दिवसांचे निवासी शिबीर २४ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२५ या दरम्यान वांगणी, तालुका अंबरनाथ जिल्हा ठाणे येथे आयोजित करण्यात आले. मुंबई विद्यापीठाने प्रत्येक महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेला पाच वर्षांसाठी एक गाव विकासासाठी ठरवून दिले आहे. त्याप्रमाणे हे शिबीर आयोजित करण्यात आले.

या शिबीराचे उद्धाटन दि. २४ डिसेंबर रोजी दुपारी ४.३० वाजता वांगणी येथे करण्यात आले. विकास महाविद्यालयाचे १०० आणि विकास ज्यु. कॉलेजचे ५० असे एकूण १५० विद्यार्थी या शिबीरात सहभागी झाले होते. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत अनेक सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांची रेलचेल या सात दिवसात विद्यार्थ्यांनी अनुभवली. श्रमदान या उपक्रमाच्या अंतर्गत येथील "पाणी अडवा पाणी जिरवा" या उपक्रमांतर्गत गणेश घाट आणि कडव पाडा येथे मिळून एकूण ३ वनराई बंधारे बांधले. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी जी पाण्याची समस्या निर्माण होते त्यापासून स्थानिक नागरिकांना दिलासा मिळवून दिला. स्वच्छ भारत अभियान राबवून वांगणी ग्रामपंचायतीच्या मदतीने ग्रामस्वच्छता




मोहीम राबविली. याशिवाय स्वच्छता हिच सेवा, अंधश्रद्धा निर्मुलन, व्यसनमुक्ती, स्वयंरोजगार इ. विषयांवर पथनाट्य सादर करण्यात आली. त्याचप्रमाणे स्वच्छता जन जागृती रॅली काढण्यात आली.

त्याचप्रमाणे विनामुल्य आरोग्य शिबिराचेही आयोजन करण्यात आले. त्यासाठी प्रत्येक घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यात आले व आरोग्य शिबिरात सहभागी होण्यासाठी आवाहन करण्यात आले. या सर्वेक्षणाद्वारे गावातील आरोग्य समस्यांची माहिती संकलित करण्यात आली. या शिबिरात रक्तदाब, मधुमेह तपासणी आणि मुलभूत निदान केल्यामुळे, लोकांना त्यांचा आरोग्याची स्थिती समजायला मदत झाली. मोफत औषधे वितरित करून डॉ. मेघा शेट्टी, डॉ. जयश्री पांचाळ, डॉ. अभिषेक नेने यांनी स्वच्छता व प्रतिबंधात्मक उपाय याबद्दल मार्गदर्शन केले. शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला.

पिरॅमिड समूहाचे श्रीम. किरण गुरबनी व श्री. रामभाऊ यांनी एक ध्यान सत्र आयोजित करून रोजच्या जीवनात मानसिक शांतता, ताण कमी करणे, आणि एकाग्रता सुधारण्यासाठी ध्यानाचे महत्त्व समजावून सांगितले.

या वास्तव्य शिबीरात "कँम्प फायर" या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कलागुणांचे सादरीकरण केले. वास्तव्य शिबीराच्या सांगता समारंभामध्ये संस्थेचे संचालक डॉ. विनय राऊत यांनी समाज कार्य करण्याची प्रेरणा ग्रामीण भागातील शिबीरामधूनच मिळते व ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवन, त्यांचे राहणीमान, त्यांच्या समस्या जवळून बघण्यास विद्यार्थ्यांना मिळतात व यातूनच विद्यार्थ्यांच्या अंगी सामाजिक जाणीव निर्माण होण्यास मदत होते असे सांगितले. याप्रसंगी संस्थेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अनघा राऊत महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीम. सी.विन्स यांची उपस्थिती लाभली. तसेच एन.एस.एस. युनिट विद्यार्थी प्रमुख कु. कृष्णा पाठक, कु. स्नेहा मेघराजे व कु. प्रवज्जा चाफे आणि सर्व विद्यार्थी स्वयंसेवकांनी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. विनायक मुळे व डॉ. संभाजी इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिबीराचे यशस्वी आयोजन केले.

## मादळमोही येथे 'दी आर्ट ऑफ लिव्हिंग हॅपिनेस प्रोग्रॅम'उत्साहात संपन्न



**दैनिक युवक आधार**

**गेवराई प्रतिनिधी/साई गावडे :** मादळमोही येथे 'दी आर्ट ऑफ लिव्हिंग हॅपिनेस प्रोग्रॅम' गुरुदेव श्री श्री रविशंकर जी यांनी शिकवल्याप्रमाणे २५ ते २९ डिसेंबर २०२५ दरम्यान उत्साहात संपन्न या कार्यक्रमातून १५+ सहभागींनी जगातील सर्वात शक्तिशाली श्वासोच्छवासाचे तंत्र 'सुदर्शन क्रिया' जाणून घेतले. सुदर्शन क्रिया अनुभव गावातील अनेक लोकांना आवडतात आणि सराव सुद्धा करतात.तणाव दूर होतो, नातेसंबंध सुधारतात. ५ दिवसात आणि रोज 3 तासामध्ये प्रतिकारशक्ती वाढली.या कार्यक्रमातून प्रत्येक साधकाला वेगवेगळी उच्च स्तरीय अनुभूती मिळाली. कार्यक्रमाला प्रशिक्षक म्हणून श्री माऊली भैया दोबोले, प्रा. संतोष सावंत सर आणि श्री. आजिनाथ भैया गावडे हे होते.कार्यक्रम आयोजन व स्वयंसेवा म्हणून गणेश भैया यादव, मनिषा गावडे, अक्षय पवार, संभाजी तळेकर, दिलीप पवार सर, अर्जुन आण्णा गावडे, नंदुजी हक्कदार, साईनाथ गावडे सर व अशोक दादा भोपळे होते.

उत्स्फूर्त सहभागी म्हणून कैलास नाना भुजबळ, महेश पवार, कृष्णा दाभाडे, डॉ. स्मिताजी भोपळे, महादेव यादव, अजय जगताप, अंगद मोहिते, अजय बिर्ला, पुनम बिर्ला, गायत्री यादव, महेंद्र मेंढके, रविराज तळेकर हे होते.कार्यक्रमामध्ये संत तुकाराम इंटरनॅशनल स्कूल ची विद्यार्थिनी कु.श्रेया गावडे व अन्य मुलांनी इंटयूशन प्रोसेस अंतर्ज्ञान प्रक्रिया प्रज्ञा योग प्रात्यक्षिक दाखवले.

# राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा पार पडली

## उमरखेडात ६ केंद्रांवर १३२३ विद्यार्थ्यांचा सहभाग

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी/ राजू गायकवाड (मोहदरी) :** इयत्ता आठवीतील राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेली शिष्यवृत्ती परीक्षा रविवार, दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी यशस्वीरीत्या पार पडली. ही परीक्षा सकाळी १०.३० ते १२.००, व दुपारी १.३० ते ३.०० या वेळेत घेण्यात आली या परीक्षेसाठी उमरखेड तालुक्यातील सहा परीक्षा केंद्रांवर एकूण १३२३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

यामध्ये गुरुदेव गोरबा मंदिर विद्यालय येथे २५६, महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय येथे २३०, साकळे विद्यालय येथे २९४,युनिव्हर्सल इंग्लिश मीडियम स्कूल येथे १९०, जिल्हा परिषद शासकीय माध्यमिक मुलांची शाळा येथे २०३



तर जिल्हा परिषद शासकीय माध्यमिक कन्या शाळा येथे १५० अशा प्रमाणे १३२३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली तर या परीक्षेसाठी संपूर्ण तालुक्यातील १३४९ विध्यार्थ्यानी सहभाग नोंदविला होता

ही परीक्षा उमरखेड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी विजय बेतेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा व्यवस्थापन करण्यात आले. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी आनंद देशमुख, अरुण बुरकूले, संतोष घुगे, विजय चौधरी, विजय इंगोले व संजय देशमुख यांनी केंद्रप्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडली. दरम्यान, यवतमाळ जिल्ह्यातील १६ तालुक्यांमधील ३१ परीक्षा केंद्रांवर एकूण ६६०३ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. विशेष बाब म्हणजे, एकट्या उमरखेड तालुक्यातच सहा केंद्रांवर १३४९ विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदवला गेला.

नेहमीच यवतमाळ जिल्ह्यात शैक्षणिक क्षेत्रात उमरखेड तालुका आघाडीवर असल्याचे बोलले जाते; इतर तालुक्यांच्या तुलनेत उमरखेडातून मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत सहभाग नोंदविल्याने ही बाब पुन्हा अधोरेखित झाली आहे.

**उमरखेड आघाडीवर का?**

पालकांची शिक्षणाबाबतची जागरूकता, शिष्यवृत्ती परीक्षांसाठी शाळांमधील नियोजनबद्ध तयारी आणि शिक्षकांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा यामुळे उमरखेड तालुक्याचा शैक्षणिक सहभाग लक्षणीय ठरत आहे.

यंदा १३४९ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत सहभाग नोंदविणे ही बाब विद्यार्थ्यांची स्पर्धात्मक तयारी दर्शविणारी आहे

## पंचरत्न मित्र मंडळ (रजि.)चेंबूर तर्फे वार्षिक दिनदर्शिका -२०२६ चे प्रकाशन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (शांताराम गुडेकर) :** समाजात विविध क्षेत्रांत लोक कल्याणार्थ कार्यरत असलेल्या सेवाभावी संस्था आहेत.या संघटना एका विशिष्ट हेतूने काम करते यातील स्वयंसेवक स्वेच्छेने व निःस्वार्थीपणे कोणतेही काम व मदत करण्यास तत्पर असतात. या संघटना प्रामुख्याने नैसर्गिक आपत्तींत सापडलेल्यांना अनेक प्रकारे साहाय्य करतात. अन्नधान्य , कपडे , गृहोपयोगी वस्तू , औषधे , वह्या पुस्तके अशा विविध अंगांनी मदतही देतात. यांशिवाय लोकांना मूलभूत हक्कांची जाणीव करून देणे, नागरी सुविधांबद्दल जागरूक करणे, बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्यास साहाय्य करणेतसेच अन्य अनेक समस्यांची सोडवणूक करण्यासाठी सहकार्य करण्याचे काम पंचरत्न मित्र मंडळ गेली अनेक वर्षे निस्वार्थी पणे करीत आहे.समाजाचे ऋण फेडण्यासाठी सतत अनेक वर्ष कार्यरत असलेल्या आर.सी. एफ कर्मचारी वर्गाच्या पंचरत्न मित्र मंडळ (रजि.) चेंबुरतर्फे अध्यक्ष अशोक भोईर, सचिव प्रदीप गावंड खजिनदार सचिन



साळूंखे , उपाध्यक्ष रमेश पाटील , सहसचिव वैभव घरत , सल्लागार हनुमंता चव्हाण, सर्व महिला -पुरुष कार्यकर्ते यांच्या प्रयत्नाने अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येतात.

पंचरत्न मित्र मंडळ (रजि.) चेंबूर तर्फ मंडळाच्या वार्षिक दिनदर्शिकेचे प्रकाशन मंगळवारी (दि.३० डिसेंबर) रोजी आर.सी. एफचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक सन्मा.श्री.श्रीनिवास मुडगेरीकर साहेब व संचालक विपणन श्री.निरंजन सोनक साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास पंचरत्न मित्र मंडळाचे अध्यक्ष श्री.अशोक भोईर,श्री.वैभव घरत, श्री.सूर्यकांत वासुदेव,श्री.मंदार भोपी,श्री. सचिन राखाडे,श्री.प्रशांत म्हात्रे,श्री.ऋषिकेश जंगम,श्री पुरु पाटसावगीकर इ. सभासद हजर होते.आर. सी. एफचे सी.एम. डी साहेबांनी पंचरत्न मित्र मंडळाच्या सामाजिक कार्याचे कौतुक करून मंडळाच्या पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## उमरी नगरपरिषद नवनिर्वाचित नगरसेवकांचा विद्यार्थी गणेश मंडळाच्या वतीने सन्मान

**दैनिक युवक आधार**

**उमरी वार्ताहर / रुपेशकुमार श्रीरामवार** : उमरी नगरपरिषद निवडणुकीत 2025 च्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गोरठेकर गटाची एकहाती सत्ता प्रस्थापित झाल्या बद्दल उमरी शहरातील मानाचा गणपती श्रीविद्यार्थी गणेश मंडळ यांच्या वतीने नवनिर्वाचित नगरसेवक मा.श्री कैलासभाऊ देशमुख गोरठेकर तसेच नगरसेवक संदीप पाटील चंदनवार , अनंतभाऊ रॅपनवाड यांचा सत्कार करण्यात आला.

या सत्कार समारंभास श्रीविद्यार्थी गणेश मंडळाचे माजी अध्यक्ष श्री लक्ष्मण भाऊ दमकोंडावार, महेश टिप्रेसवार, श्रीनिवास मुक्कावार, गोविंद निंवळे, तानाजी




पाटील आनेराये, मंगेश डोपलवार, लखन अट्टल, संकेत मुक्कावार, साई मुक्कावार, आक्षय निलावार, केते पाटील, आकाश मुगळीकर,चिकटवाड मामा यांच्यासह विद्यार्थी गणेश मंडळाचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गोदावरी विलासराव चव्हाण

**हदगाव (प्रतिनिधी)/विश्वदीप कांबळे**

**हादगाव :** गोदावरी विलासराव चव्हाण हे आष्टी, तालुका हदगाव, जिल्हा नांदेड येथील रहिवासी असून ते बहुआयामी कलाकार म्हणून ओळखले जातात. गायन व वादनासह ते प्रबोधनकार, भजनकार, साहित्यकार, कीर्तनकार तसेच गायक–भजनी म्हणून सामाजिक क्षेत्रात सक्रिय आहेत. मागील काही वर्षांपासून चव्हाण हे गायनाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य सातत्याने करीत आहेत. दारूबंदी, स्त्री भ्रूणहत्या प्रतिबंध, पर्यावरण संरक्षण, ग्राम स्वच्छता अभियान आदी विविध सामाजिक विषयांवर ते लोकजागृती करतात. त्यांच्या भजन–कीर्तनातून समाजाला सकारात्मक संदेश मिळत असून ग्रामीण भागात



या उपक्रमांना मोठा प्रतिसाद मिळत आहे.

सांस्कृतिक कलेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांवर प्रबोधन करण्याचे त्यांचे कार्य प्रेरणादायी ठरत असून समाजातील विविध घटकांकडून त्यांच्या कार्याचे कौतुक होत आहे

## "मा.श्री.बाळासाहेब रामचंद्र गोरे" यांची जनसागर कामगार सहकारी पतपेढी, मुंबई सचिव पदी बिनविरोध निवड..!

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर :** अखिल महाराष्ट्र माथाडी आणि ट्रान्सपोर्ट जनरल कामगार युनियनचे सेक्रेटरी टोळी नंबर २९०२ चे मुकादम मा.श्री.बाळासाहेब रामचंद्र गोरे यांची जनसागर कामगार सहकारी पतपेढी मर्यादित मुंबईच्या सचिव पदी बिनविरोध निवड झाली. माथाडी कामगार ते माथाडी पतपेढी पर्यंत त्यांचा हा प्रवास सतरा वर्षांचा आहे. त्यांनी एक माथाडी कामगार म्हणून जीवनात सुरुवात केली माथाडी कायद्याचा अभ्यास करून, प्रत्येक टोळीला रायगड जिल्ह्यामध्ये न्याय मिळवून देणे. एचपीसीएल, बीपीसीएल या ठिकाणी माथाडी कामगारांना न्याय मिळवून देणे, पतपेढीमार्फत त्यांच्या गरजा भागवणे आणि कष्टकरी कामगारांना न्याय मिळवून देणारे, माथाडी कामगारांचे एकमेव धडाडीचे नेतृत्व म्हणजेच मा.श्री.बाळासाहेब गोरे. आज मंगळवार दिनांक ३०/१२/२०२५





रोजी सचिवपदी निवड झाली याबद्दल त्यांचे मनःपूर्वक स्वागत करण्यात आले.

यावेळी माथाडी कामगार टोळी नंबर २९०२ प्रमुख श्री.अरुण गावंड यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा दिल्या. एचपीसीएल, बीपीसीएल तमाम माथाडी कामगार व टोळी नंबर २९०२ मधील सर्व कामगार व मित्रपरिवार यांच्या वतीने देखील त्यांना भावी वाटचालीस लक्ष लक्ष शुभेच्छा देण्यात आल्या.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भोजेवाडी येथे वर्गखोलीचे भूमिपूजन संपन्न

**दैनिक युवक आधार**

**अंभोरा प्रतिनिधी :** आष्टी तालुक्यातील भोजेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे सुरेश आण्णा धस यांच्या स्थानिक विकास निधीतून मंजूर झालेल्या नवीन वर्गखोलीच्या बांधकामाचे भूमिपूजन मोठ्या उत्साहात व ग्रामस्थांच्या उपस्थितीत पार पडले.

भोजेवाडी गावातील ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समितीने विद्यार्थ्यांच्या वाढत्या संख्येचा विचार करून अतिरिक्त वर्गखोलीची मागणी सातत्याने मांडली होती. या मागणीची तात्काळ दखल



घेत आमदार सुरेश आण्णा धस यांनी सदर वर्गखोलीस मंजुरी दिली. प्राथमिक शिक्षण हा संपूर्ण शिक्षणप्रणालीचा पाया असून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासाठी सुरक्षित, स्वच्छ व सुस्थितीत शाळा इमारत अत्यावश्यक आहे, या दूरदृष्टीतून हा निर्णय घेण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले.या विकासकामाबद्दल ग्रामस्थांनी आमदार सुरेश आण्णा धस यांचे मनःपूर्वक आभार मानले. नवीन वर्गखोलीमुळे शाळेतील शैक्षणिक वातावरण अधिक अनुकूल होणार असून विद्यार्थ्यांना बसण्याची, अध्ययनाची व उपक्रम राबविण्याची उत्तम सुविधा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेत निश्चितच वाढ होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. सरपंच बाबासाहेब गोफणे यांच्या विशेष प्रयत्नातून वर्ग खोली आणली .बाबासाहेब गोफणे (सरपंच), शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री. शंकर लकडे, सुखदेव खटके, मच्छिंद्र गोफणे, परमेश्वर खटके, अनिल पालवे, गीताराम पालवे, आनंद लकडे, बाळू गोफणे, भाऊसाहेब गोफणे, राजू लकडे, सोन्याबापू पालवे, मस्के साहेब (इंजिनियर) यांच्यासह अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच या प्रसंगी मुख्याध्यापक विजू कोकाटे सर व आदर्श शिक्षक महेश वाटाडे सर यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी शाळेच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगती बद्दल समाधान व्यक्त केले

एकूणच भोजेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शैक्षणिक व भौतिक प्रगतीच्या दृष्टीने हा भूमिपूजन सोहळा महत्त्वपूर्ण ठरला असून, भविष्यातही शाळेच्या विकासासाठी आवश्यक ती सर्व मदत करण्यात येईल, असा आशावाद ग्रामस्थांनी व्यक्त केला.

## धर्माबादच्या ग्रामीण रुग्णालयात डायलिसिस युनिट सुरू

**दैनिक युवक आधार**

**धर्माबाद प्रतिनिधी एडके पुनम :** धर्माबाद येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयात आ. राजेश पवार यांच्या प्रयत्नातून डायलिसिस युनिट नुकतेच सुरू करण्यात आले असून धर्माबाद तालुक्यासह बिलोली व उमरी तालुक्यातील रुग्णांना या अत्यावश्यक सेवेचा लाभ मिळणार आहे.वेदकीय अधीक्षक डॉ. वेणू गोपाळ पंडित, रुग्ण कल्याण समिती सदस्य राम पाटील बाळापूरकर यांच्या मागणीनुसार व आ. राजेश पवार यांच्या प्रयत्नातून धर्माबाद शासकीय रुग्णालयास डायलेसिस सेंटरची मान्यता मिळाली होती. ते सेंटर आता चालू झाले आहे. अद्यावत व वातानुकूलित असलेल्या या डायलेसीस सेंटरमध्ये तब्बल ५ युनिट असून एकाच वेळी ५ बेडवर ५ रुग्णांचा डायलिसिस सेवा पुरवली जाणार आहे. सोमवार ते शनिवार या सहा दिवशी सकाळी नऊ वाजल्यापासून ते सायंकाळी चार वाजल्यापर्यंत सदरील युनिट रुग्णासाठी खुले राहणार असून या युनिटमध्ये तज्ञ युवा टीम कार्यरत आहे. यामध्ये वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर. वेणुगोपाल पंडित यांच्या युनिट मार्गदर्शनाखाली प्रमुख डॉक्टर मोनिका पावडे, टेक्नीशियन समय कांबळे, संपशील कांबळे, साजिद सय्यद, परिचारिका निकिता नागलवाडे व स्वच्छता सेवक उत्तम वाघमारे यांची टीम युनिटच्या वेळेत लक्ष ठेवणार आहे. यांच्या उद्धाटन प्रसंगी वेदकीय अधीक्षक डॉ. वेणुगोपाळ पंडित, रुग्ण कल्याण समितीचे सदस्य राम पाटील बाळापुर कर, डॉ. प्रवीण कांबळे, मेडिकल असोसिएशनचे कोषाध्यक्ष मनोज पाटील विकास आगळे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

**रुग्णांला होणार फायदा**

धर्माबादच्या शासकीय रुग्णालयात डायलिसिस युनिट चालू झाल्यामुळे डायलिसच्या रुग्णास नवसंजीवनी मिळणार आहे. त्यामुळे धर्माबाद तालुक्याचा बिलोली तालुक्यातील रुग्णांनी या सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन वेदकीय अधीक्षक. डॉ. वेणू गोपाल पंडित यांनी केले आहे.

दैनिक युवक आधार हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# प्राचार्य तथा मुख्याध्यापक श्री डी पी कदम सरांच्या सेवापूर्ती गौरव सोहळ्यानिमित्त...

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी/प्रकाश गवारे :** असे म्हणतात की प्रेरणेशिवाय यश आणि आधाराशिवाय स्वावलंबन जसे शक्य नसते तसे आम्हाला वेळोवेळी प्रेरणा देणारे, आधार देणारे,आमचे मार्गदर्शक,गेली कित्येक वर्ष ईश्वरीय तेजाचा अंश घेऊन ज्ञानदानाचे कार्य करणारे, अर्थशास्त्र आणि वाणिज्य शाखेचा सखोल अभ्यास असणारे,आमचे काकाश्री, श्री. प्रा.डी पी कदम सर हे आज यशस्वीपणे 35 वर्ष प्रदीर्घ सेवा पूर्ण करून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत.

निरोपाचा हा दिवस आज ना उद्या आपल्या प्रत्येकाच्या जीवनात येणार आहे जे टाळता येत नाही त्याचा आनंदाने स्वीकार करण्यातच शहाणपण असते.

श्री प्रा. डी पी कदम सर यांनी फार मोठ्या काळाची सेवा श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीच्या अनेक उच्च माध्यमिक विद्यालयासाठी दिलेली आहे*. *सरांचे अनेक विद्यार्थी आज समाजात सरकारी कर्मचारी अधिकारी म्हणून वावरत आहेत.* *श्री प्रा. डी पी कदम सर यांनी श्री शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय आणि विद्यार्थ्यांसाठी तन मन लावून कार्य केले आहे. केवळ नोकरी म्हणून त्यांनी जबाबदारी पार पाडलेली नसून आपले जीवन ध्येय समजून आपली सेवा पूर्ण केली आहे.

सरांचे अध्यापन कौशल्य, विषयावरील प्रभुत्व आणि विद्यार्थ्यांसाठी आत्मीयता या गोष्टी मला अनुकरणीय वाटतात. नियमांच्या चौकटीत राहून प्रत्येक जबाबदारी चोखपणे पार पडण्याची त्यांची वृत्ती राहिली आहे.

आपल्या कनिष्ठ सहकार्याच्याप्रती सहकार्याच्या भावनेतून त्यांनी कितीतरी स्नेहाची आपलेपणाची नाती निर्माण केली आहेत.बऱ्याचदा अधिकाऱ्याच्या पदावर असताना कर्तव्याचा भाग म्हणून त्यांनी




कठोर वर्तन दाखविले ही असेल परंतु त्यांच्या मनात कुणासाठीही कधीही कटूता राहिलेली नसेल हे आम्ही जाणतोच.

कुठलेही महाविद्यालय हे दगडविटांची इमारत नसते तर त्या महाविद्यालयात प्राध्यापक विद्यार्थी कर्मचारी हे त्या महाविद्यालयाचा खरा आत्मा असतात. प्राध्यापक आणि विद्यार्थ्याशिवाय महाविद्यालयाला काही अर्थ नसतो आणि अनुभवांची जागा जगातली कुठलीही गोष्ट घेऊ शकत नसते म्हणूनच जेव्हा कुठले अनुभवी प्राध्यापक महाविद्यालयाला सोडून जातात तेव्हा महाविद्यालयाचे काही अस्तित्व ते आपल्यासोबत नेत असतात.सरांच्या निवृत्तीनंतर सरांची पोकळी त्या श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीच्या समूहाला (महाविद्यालयाला) कायमच जाणवत राहील.

आपल्या सेवाकाळात वेळेच्या कमतरतेमुळे सर बऱ्याचदा आपल्या परिवाराला आपल्या आरोग्याला, छंद यांना वेळ देऊ शकत नव्हते ती अमूल्य अशी वेळ त्यांच्याजवळ आता असणार आहे. या गोष्टीचा नक्कीच आनंद वाटतो. आपल्या निवृत्तीनंतरची दुसरी इनिंगही सर अंगभूत आत्मविश्वासाने आणि कर्तबगारिने यशस्वी करून दाखवतील यात तीळ मात्र शंका नाही. त्यांचा सहवास स्नेह मार्गदर्शन यापुढेही श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी व महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना असंच मिळत राहील ही त्यांच्याकडून हमी देतो.

सेवानिवृत्ती ही केवळ कर्मचाऱ्याच्या सेवेतून मुक्त होण्याची घटना नाही तर ती त्यांच्या आयुष्यातील नव्या अध्यायाची सुरुवात आसते.सेवानिवृत्त होणाऱ्या आमच्या श्री डी पी कदम सरांनी आपल्या आयुष्याचा बहुमूल्य कालावधी विद्यार्थ्यांसाठी व महाविद्यालयासाठी अर्पण केला आहे*. *त्यांची मेहनत निष्ठा आणि आपल्या कर्तव्यात असलेल्या प्रामाणिकपणामुळे एक उत्तम आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या कार्याच्या माध्यमातून त्यांनी अनेकांचा विश्वास जिंकला. अनेकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविला. कधीकधी जीवनाच्या प्रवासात असे वाटते की हा प्रवास संपला पण खरंतर तो एक नवीन प्रारंभ असतो

**हर अंत एक नई सुरुवात है,**
**हर डगर पर उमीदोंकी बात है**
**जो साथ मिला उसे यादो मे बसा लो,**
**आगे का सफर खुशियों से सजालो!**

त्यांना आयुष्याच्या या एका वेगळ्या वळणावर आपल्या सगळ्यांकडून मी खूप खूप शुभेच्छा देतो. आज ते आपल्या सेवेतून निवृत्त होत असले तरी त्यांना आनंद, यश आणि समाधान मिळावे हीच अपेक्षा व्यक्त करतो. तेव्हा त्यांच्या पुढील जीवनासाठी खूप खूप शुभेच्छा देतो.

## पनवेल महापालिका निवडणूक : प्रभाग १८ मध्ये भाजपाचे खाते उघडले,

### नितीन जयराम पाटील बिनविरोध विजयी

**दैनिक युवक आधार**
**प्रसाद हनुमंते (पनवेल) :** पनवेल महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १८ मधून भाजपाचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन जयराम पाटील हे बिनविरोध निवडून आले असून, यासह भाजपाने या निवडणुकीत पहिले खाते उघडले आहे.

प्रभाग क्रमांक १८ हा नितीन पाटील यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. या प्रभागातून त्यांनी पुन्हा एकदा आपली मजबूत पकड सिद्ध केली आहे. नागरिकांशी असलेला त्यांचा दांडगा जनसंपर्क, प्रत्येकाशी आपुलकीने साधलेला संवाद, हाकेला तत्काळ धावून जाणारे नेतृत्व, संवेदनशीलता आणि कार्यतत्परता यामुळे त्यांचा विजय आधीच निश्चित मानला जात होता. त्यामुळे केवळ औपचारिक घोषणाच बाकी होती.

नितीन पाटील यांची निवड रोखण्यासाठी



विरोधकांकडून विविध प्रयत्न झाले. मात्र त्यांच्या बिनविरोध निवडीमुळे प्रभागात वर्चस्व असल्याचा दावा करणाऱ्यांना चांगलीच चपराक बसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

पनवेल महापालिका निवडणुकीत महायुतीचे पहिले खाते भाजपाच्या माध्यमातून उघडल्याने पक्षात उत्साहाचे वातावरण आहे. याबाबत प्रतिक्रिया देताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी,

“पनवेल महापालिकेत पुन्हा एकदा भाजपच एकहाती सत्तेत येईल,” असा ठाम विश्वास व्यक्त केला.

## आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते भरडधान्य खरेदीचा शुभारंभ

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे :** तालुक्यातील फर्दापूर येथे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीमालाला हमीभाव मिळावा तसेच भरडधान्य पिकांच्या उत्पादनाला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने आज आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते फर्दापूर ता. सोयगाव येथे खरीप पणन हंगाम २०२५-२६ शासकीय आधारभूत किंमत अंतर्गत भरडधान्य खरेदी केंद्राचा शुभारंभ करण्यात आला. या खरेदी केंद्राचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन आमदार अब्दुल सत्तार यांनी केले आहे.शुभारंभप्रसंगी आमदार अब्दुल सत्तार यांनी उपस्थित शेतकरी बांधवांशी संवाद साधला. भरडधान्ये ही आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असून बदलत्या हवामान परिस्थितीत ही पिके कमी पाण्यात व कमी खर्चात उत्पादन देणारी असल्याचे त्यांनी नमूद केले. शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांसोबतच भरडधान्य शेतीकडे वळावे, असे आवाहन त्यांनी केलेला या खरेदी केंद्रामार्फत मका,ज्वारी,बाजरी,आदी भरडधान्यांची थेट शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यात येणार असून त्याचा लाभ मध्यस्थांशिवाय थेट शेतकऱ्यांना मिळणार आहे.यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढण्यास मदत होईल, असा




विश्वास आमदार सत्तार यांनी व्यक्त केला. शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले. फर्दापूर येथील शासकीय गोडाऊन येथे आता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून शासनाच्या धोरणानुसार मका, ज्वारी, बाजरी या सारखे भरडधान्य खरेदी केल्या जाणार आहे.फर्दापूर येथे भरडधान्य खरेदी केंद्र सुरू करण्याबाबत अनेक दिवसाची मागणी होती. आमदार अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने येथे भरडधान्य खरेदी केंद्र सुरू झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.कार्यक्रमास कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती संदीप राऊत, संचालक दारासिंग चव्हाण,माजी जि. प.सदस्य गोपीचंद जाधव जाधव, शिवसेना तालुकाप्रमुख धरमसिंग चव्हाण, विलास वराडे,उस्मान खा पठाण फिरोज खा पठाण,राधेश्याम जाधव,रंगनाथ वराडे, आली खा शब्बीर खा,भीमा बोराडे, शेख मुक्तार,शेख जाकेर,आरिफ शाह,अक्षय काळे,संतोष बोडके,कबीर शाह कुणाल राजपूत,हर्षल काळे,रईस खान,उस्मान खान शेर खा,विजय तायडे, वसंत चव्हाण,मकसूद कादरी, इरफान शेख, सुपडू पाटील, राजेश दिंडे, सय्यद अजीम, विनोद राठोड,शफिक पठाण, उमर पठाण, सय्यद फारुख,कृउबा समितीचे सचिव विश्वास पाटील आदिंसह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

## जिल्हा परिषद हायस्कूल कावराबांध येथे स्नेहसंमेलनाचे थाटात उद्घाटन; आमदार संजय पुराम यांची प्रमुख उपस्थिती

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड प्रतिनिधी जिल्हा (गोंदिया ) :** जिल्हा परिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, कावराबांध येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वार्षिक स्नेहसंमेलन व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार, ३० डिसेंबर २०२५ रोजी या त्रि-दिवसीय सोहळ्याचा शानदार उद्घाटन सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाचे मुख्य उद्घाटक म्हणून देवरी-आमगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार संजय पुराम उपस्थित होते, त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची रीतसर




सुरुवात करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आमदार संजय पुराम म्हणाले की, शैक्षणिक प्रगतीसोबतच विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात आपली चमक दाखवावी, अशा व्यासपीठामुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो.या उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्षस्थान जिल्हा परिषद सदस्य व शा.व्य.स. अध्यक्षा विमलताई बबलू कटरे यांनी भूषविले. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून शाळेच्या प्रगतीचे कौतुक केले आणि विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून पंचायत समिती सदस्य गुमानसिंह उपराडे, गावचे सरपंच तसेच सामाजिक कार्यकर्ते टिकेश बोपचे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. या सोहळ्याला कावराबांध परिसरातील नागरिक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ३० डिसेंबरपासून सुरू झालेला हा सोहळा १ जानेवारी २०२६ पर्यंत चालणार असून, यामध्ये विविध स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. शाळेचे प्राचार्य आणि शिक्षक वृंदाने कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन केले असून, उपस्थित नागरिकांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे भरभरून कौतुक केले.

## हादगाव गायनाच्या माध्यमातून सामाजिक जनजागृतीचे कार्य

### सिंधू माधव खतगावकर यांचे उल्लेखनीय योगदान

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी/विश्वदीप कांबळे :** आष्टी, ता. हादगाव, जि. नांदेड येथील रहिवासी सिंधू माधव खतगावकर हे गेल्या अनेक वर्षांपासून गायन व वादनाच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधनाचे महत्त्वपूर्ण कार्य करत आहेत. ते गायन-वादन कलाकार, प्रबोधनकार, भजनकार, साहित्यकार, कीर्तनकार व भजनी म्हणून समाजात परिचित आहेत.

आपल्या कला-साधनेच्या जोरावर त्यांनी जनजागृती, तंत्रशक्तीविषयक प्रबोधन, दारूबंदी, स्त्री भ्रूणहत्या प्रतिबंध, पर्यावरण संवर्धन तसेच ग्राम स्वच्छता अभियान यांसारख्या विविध सामाजिक विषयांवर प्रभावी जनजागृती केली आहे. भजन, कीर्तन व प्रबोधनात्मक गीतांच्या माध्यमातून ते समाजातील प्रत्येक घटकापर्यंत



संदेश पोहोचवण्याचे कार्य सातत्याने करत आहेत.

ग्रामीण भागातील कार्यक्रम, सार्वजनिक उपक्रम, सामाजिक चळवळी तसेच विविध जनजागृती अभियानांत त्यांचा सक्रिय सहभाग राहिला असून, त्यांच्या गायनामुळे समाजात सकारात्मक बदल घडून येण्यास मदत होत आहे. मागील काही वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेले हे जनजागृतीचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## ओम साई मित्र मंडळ आयोजित भव्य दिव्य बॉक्स क्रिकेट स्पर्धा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी श्री विकास वायाळ :** मुंबई ओम साई मित्र मंडळाचे संस्थापक कै. अनंत शांताराम मोरे यांच्या स्मरणार्थ दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा ओम साई मित्र मंडळ आयोजित भव्य दिव्य बॉक्स क्रिकेट स्पर्धा म्हणजेच अनंत प्रिमियर लीग 2025-26 पर्व 4 थे या लीग चे भटवाडी घाटकोपर मधील रामजी नगर या ठिकाणीआयोजन केले आहे. अनंत प्रिमियर लीग मधील क्रिकेट चे सामने ,2026 मध्ये जानेवारी महिन्यात शनिवार दिनांक 10 आणि रविवार दिनांक 11 या दिवशी होणार आहेत...



त्यापुर्वी

अनंत प्रिमियर लीग पर्व 4 थे मध्ये खेळणाऱ्या खेळाडूंचा भव्य दिव्य असा धमाकेदार मेघा लिलाव ( AUCTION ) आणि TROPHY ( चषक )अनावरण सोहळा रविवार दिनांक 28 डिसेंबर 2025 रोजी संध्याकाळी ठिक 7 वाजता ओम साई मित्र मंडळाच्या पटांगणामध्ये हा सोहळा पार पडला .कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून अभिनेते , लेखक, दिग्दर्शक , सह कलाकार , दादासाहेब फाळके पुरस्कार 2025 चे विजेते , दैनिक युवक आधारचे मुंबई प्रतिनिधी पत्रकार आणि दादासाहेब फाळके चित्रपट युनियन चे मुंबई प्रदेश कार्याध्यक्ष माननीय श्री. विकास वायाळ सर आणि भारतीय जनता पार्टी पक्षाचे वॉर्ड क्रमांक 128 चे महामंत्री आपला माणूस दयावान डॅशिंग आमदार राम कदम साहेबांचे आमदार प्रतिनिधी महाराष्ट्र राज्य श्री. मनिष साळवे सर तसेच ओम साई मित्र मंडळाचे अध्यक्ष संदिप मोरे, सेक्रेटरी राजेंद्र शिंदे , खजिनदार संदिप गिजे तसेच मंडळाचे सर्व पदाधिकारी सदस्य आणि अनंत प्रिमियर लीग कमिटी सदस्य सर्वांनी एकत्र उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली....

## मक्याच्या शासकीय हमीभाव विक्रीचा शेतकऱ्यांना दिलासा; युवासेना तालुका प्रमुख कुणाल राजपूत यांचे शेतकऱ्यांना आवाहन

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे :** तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी खरीप पणन हंगाम २०२५–२६ अंतर्गत शासकीय आधारभूत किंमत योजनेतून भरड धान्य (मका) खरेदी केंद्राचे उद्घाटन दिनांक ३० रोजी करण्यात आले. हे उद्घाटन सिल्लोड–सोयगाव विधानसभा मतदारसंघाचे भाग्यविधाते लोकनेते आमदार अब्दुल सत्तार साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.यावेळी शासनाच्या वतीने मका खरेदीसाठी २४०० रुपये प्रति क्विंटल हमीभाव निश्चित करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी सोयगाव तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ येथे तात्काळ ऑनलाइन नोंदणी करून आपला मका फर्दापूर येथील शासकीय धान्य खरेदी केंद्रावर विक्रीसाठी न्यावा, असे आवाहन युवासेना तालुका प्रमुख कुणाल भाऊ राजपूत यांनी केले आहे.



शेतकऱ्यांच्या हितासाठी ही योजना प्रभावीपणे राबवावी, यासाठी राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. त्यास सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल सिल्लोड– सोयगाव विधानसभा मतदारसंघाचे लाडके आमदार अब्दुल सत्तार साहेब यांचे युवासेनेच्या वतीने आभार मानण्यात आले.

या शासकीय आधारभूत किंमत योजनेमुळे शेतकऱ्यांना योग्य दर मिळणार असून दलालांपासून मुक्त होऊन थेट शासनाकडे मका विक्रीची संधी उपलब्ध झाली आहे, असेही कुणाल राजपूत यांनी नमूद केले.

## उंबरठाण महाविद्यालयात 'विवाहपूर्व समुपदेशन' विषयावर ज्ञानविस्तार कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, आजीवन अध्ययन व ज्ञानविस्तार विभाग आणि डांग सेवा मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय, उंबरठाण यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय 'विवाहपूर्व समुपदेशन' 'ज्ञानविस्तार कार्यक्रम पार पडला.महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एकनाथ आहेर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. व्याख्याते डॉ. प्रितेश वाणी यांनी 'आदिवासी भागातील तरुण-तरुणींसाठी विवाहपूर्व समुपदेशन' या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.




लग्न म्हणजे केवळ दोन व्यक्तींचे मिलन नसून ती एक सामाजिक आणि मानसिक जबाबदारी आहे, असे त्यांनी पटवून दिले.तसेच आरोग्य सेविका श्रीमती विजया चौधरी यांनी 'विवाहानंतर आरोग्यविषयक समुपदेशन' या विषयावर संवाद साधला. त्यांनी वैयक्तिक आरोग्य, कुटुंब नियोजन आणि वैवाहिक जीवनातील आरोग्याच्या विविध पैलूंवर मुद्दे उपस्थित करत विद्यार्थ्यांना मोलाची माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समन्वयक प्रा. मंदिप राऊत यांनी केले, तर प्रा. कलावती थविल यांनी उपस्थितांचे आभार मानले.प्रसंगी आरोग्य सेविका शीतल गाडे, प्रा. उमा देशमुख, प्रा. तुळशीराम चौधरी, प्रा. राजाराम कणसे, प्रा. मधुकर गावित, प्रा. हेमलता महाले, प्रा. राजेश पेटार, प्रा. किशोर काळे तसेच श्री. अनिल कदम, अनिल ठाकरे, हिरामण गावित, यशोदा गावित आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# उपजिल्हा रुग्णालय कळमनुरी, येथे मनमानी कारभार

## वंचित बहुजन आघाडीचे निवेदन : अनेकांची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी कळमनुरी :** उपचारात गंभीर निष्काळजीपणा केल्याचा आरोप गंभीर निष्काळजीपणा केल्याचा आरोप करत वंचित बहुजन आघाडीच्या वतीने कळमनुरी येथील जिल्हा शल्य चिकित्सक तथा वैद्यकीय अधीक्षक यांना लेखी तक्रार निवेदन सादर करण्यात आले. संबंधित वैद्यकीय अधिकारी डॉ. बालाजी जाधव यांच्यावर तातडीने कडक कारवाई करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

निवदेनानुसार, मागासवर्गीय महिला रुग्णास गंभीर दुखापत असताना केवळ थातूरमातूर




उपचार करण्यात आले. रुग्णालयात दाखल असूनही तब्बल २४ तास कोणतेही पुढील उपचार न केल्याने तिला शारीरिक व मानसिक त्रास सहन करावा लागला. कर्तव्यावर असतानाही उपचारास नकार देत बेजबाबदार वर्तन केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन दोन दिवसांच्या आत कठोर कारवाई करावी, अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी



**कर्मचारी यांच्या गाडी चे ची पार्किंग बेसिस्त. (वैधकीय अधिकारी यांचे दुर्लक्ष )**

कळमनुरी वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष राजू कांबळे, युवा तालुकाध्यक्ष मोहम्मद असलम, युवा महासचिव संतोष इंगोले, युवा सचिव जय भीम डोंगरे, माणिक पाईकराव, दादाराव खंदारे, मनोज वाढवे, राष्ट्रपाल वाढवे, दिनेश पाईकराव, समाधान पाईकराव, दीपक पाईकराव, किशन पाईकराव आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

(क्रिमिनल )प्रकरणातील असूनही तिची वैद्यकीय नोंद योग्य पद्धतीने न करणे तसेच पोलीस प्रशासनास तातडीची माहिती न देण्यामागील कारणांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. २४ तास उपचार न केल्यामुळे झालेल्या गंभीर निष्काळजीपणास जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करावी, असेही नमूद करण्यात आले आहे. तसेच, कॉलद्वारे संपर्क साधल्यावर खोटी माहिती देणे, उडवाउडवीची उत्तरे देणे व अरेरावीची भाषा वापरण्याचा आरोप करून त्याबाबतही कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

## म्हसळा पोलिस स्टेशन येथे पोलिस-पत्रकार संवादातून शहराच्या समस्यांवर सखोल चर्चा

**दैनिक युवक आधार**
**म्हसळा तालुका प्रतिनिधी/ शिरीष समेळ :** म्हसळा पोलिस स्टेशनच्या वतीने स्थानिक पत्रकारांशी सुसंवाद साधण्यासाठी २०२६ वर्षाच्या पूर्वसंध्येला पत्रकार सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. ही सभा म्हसळा पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक श्री. रविंद्र पारखे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली.

या सहविचार सभेसाठी म्हसळा तालुका पत्रकार संघाचे सर्व पत्रकार तसेच पत्रकार संघाचे सभासद नसले, तरी राज्य व जिल्हास्तरावरील नामांकित वर्तमानपत्रांमध्ये कार्यरत असलेले सर्व पत्रकार यांना विशेष निमंत्रण देण्यात आले होते. त्यामुळे ही सभा सर्वसमावेशक ठरून पत्रकार व पोलिस



प्रशासन यांच्यातील संवाद अधिक प्रभावी झाला.

सभेदरम्यान म्हसळा शहर व तालुक्यातील कायदा व सुव्यवस्था, वाहतूक कोंडी व शिस्त, सामाजिक सुरक्षितता, महिला व विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचे प्रश्न, तसेच नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. पत्रकारांनी आपल्या प्रत्यक्ष अनुभवातून शहरातील समस्या मांडत प्रशासनाचे लक्ष विविध गंभीर बाबींकडे वेधले. यावेळी सहाय्यक पोलिस निरीक्षक श्री. रविंद्र पारखे यांनी पत्रकारांच्या सूचना व मतांना सकारात्मक प्रतिसाद देत, पोलीस प्रशासन व पत्रकार यांच्यात समन्वय राखणे अत्यंत आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. समाजातील समस्या वेळेत समोर आणण्यात पत्रकारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, पोलिस प्रशासन नेहमीच पत्रकारांना सहकार्य करण्यास तयार असल्याचे त्यांनी सांगितले.

सभेदरम्यान पत्रकारांनी मांडलेल्या विविध मुद्द्यांवर योग्य त्या उपाययोजना राबविण्याचे आश्वासन पोलिस प्रशासनाच्या वतीने देण्यात आले. तसेच भविष्यात अशा प्रकारच्या सहविचार सभा नियमितपणे आयोजित करून संवाद अधिक दृढ करण्याचा मानसही व्यक्त करण्यात आला.ही सहविचार सभा पोलीस व पत्रकार यांच्यातील परस्पर विश्वास व सहकार्य वाढविणारी ठरली असून, म्हसळा शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने हे एक सकारात्मक पाऊल असल्याची भावना उपस्थित पत्रकारांनी व्यक्त केली.या सभेला म्हसळा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष शशिकांत शिर्के, ज्येष्ठ पत्रकार संजय खांबेटे, उदय कळस, संतोष उध्दरक, निकेश कोकचा, महेश पवार, अशोक काते, प्रा. शिरीष समेळ यांच्यासह अन्य पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सहविचार सभेच्या शेवटी ज्येष्ठ पत्रकार संजय खांबेटे यांनी पोलिस प्रशासनाचे आभार मानत, पत्रकार संघाची पुढील वाटचाल कशी असावी, पत्रकारितेची सामाजिक जबाबदारी आणि प्रशासनाशी समन्वय राखण्याबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

## शौर्य मेडिकलचे भव्य उद्घाटन संपन्न

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी पुर्णा शिवाजी लोंढे :** सिद्धार्थ नगर, पुर्णा येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या "शौर्य मेडिकल" या वैद्यकीय दुकानाचे उद्घाटन शुक्रवार दि. ०२ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता उत्साहात पार पडले. "आपल्या सेवेत... आमचे नवीन..." या ब्रीदवाक्यासह शौर्य मेडिकलच्या माध्यमातून नागरिकांना दर्जेदार औषधे व तत्पर सेवा देण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

या उद्घाटन सोहळ्यास भिवलू पंय्यवंश यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमास प्रमुख




उपस्थिती म्हणून नितीन (बंटी) लक्ष्मणराव कदम, मा. प्रकाश दादा कांबळे, मा. उत्तम मुगाची खंदारे, मिलिंद दादा कांबळे (महाराष्ट्र पोलीस), अनिल दादा खरखराटे, देवराव दादा खंदारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.उद्घाटनावेळी उपस्थित मान्यवरांनी शौर्य मेडिकलच्या उपक्रमाचे कौतुक करत नागरिकांना गुणवत्तापूर्ण औषधे, योग्य मार्गदर्शन व विश्वासार्ह सेवा मिळाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भगवान शंकर सोनकांबळे, दिनेश शंकर सोनकांबळे, सुजल भगवान सोनकांबळे, नामदेव संतराम मगरे व सुबोध संतराम मगरे यांनी विशेष परिश्रम घेतले. शौर्य मेडिकल सुरू झाल्याने सिद्धार्थ नगर व परिसरातील नागरिकांना आरोग्यविषयक सुविधा अधिक सुलभपणे उपलब्ध होणार आहेत.

## नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर सायबर फसवणुकीबाबत सतर्कतेचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी /अनिकेत मोहित :** नवीन वर्षाच्या निमित्ताने नागरिकांना येऊ शकणाऱ्या सायबर फसवणुकीच्या घटनांबाबत श्रीवर्धन पोलिस ठाण्याच्या वतीने सतर्कतेचे आवाहन करण्यात आले आहे. नवीन वर्षाच्या शुभेच्छा, बक्षिसे, सवलती किंवा विविध आमिषे दाखवणाऱ्या अनोळखी लिंक, मेसेज, ई-मेल तसेच एपीके (APK) फाईल्स नागरिकांच्या मोबाईलवर येण्याची शक्यता असून अशा कोणत्याही लिंक किंवा फाईल्स उघडू नयेत, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

अनोळखी लिंकवर क्लिक केल्यास मोबाईलमधील वैयक्तिक माहिती, बँक तपशील चोरीला जाण्याची तसेच आर्थिक फसवणूक होण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे



कोणताही संशयास्पद संदेश, कॉल किंवा लिंक आल्यास त्याकडे दुर्लक्ष करावे आणि आवश्यक असल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

नागरिकांनी सजग राहून सायबर सुरक्षिततेची काळजी घ्यावी, कोणत्याही आमिषाला बळी न पडता नवीन वर्षाचे स्वागत आनंदात, सुरक्षित व निर्भय वातावरणात करावे, असे आवाहन श्रीवर्धन पोलिस ठाण्याच्या वतीने करण्यात आले आहे.

## नगरपंचायत कडे सन 2025 साली आलेला दिव्यांग कल्याणी निधी उर्वरित लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याची मागणी अन्यथा आमरण उपोषणाचा इशारा

**दैनिक युवक आधार**
**मनोज उर्फ एम डी सुरोशे :** महागाव नगरपंचायत यांच्याकडून दिव्यांग कल्याण निधी गेल्या तीन वर्षापासून रखडलेला होता त्यास प्राधान्य क्रमाने घेऊन दिव्यांग कल्याण निधी वाटप करण्याचे काम युद्ध पातळीवर करण्यात आले अशा प्रकारच्या बातम्या नगरपंचायत कार्यालयाने वर्तमानपत्रात टाकल्या परंतु वास्तविक पाहता अनेक अपंग या यादीतून वगळण्यात आले यापैकी एक नाव म्हणजे ऋतिक अवधूतराव नरवाडे नगरपंचायत कार्यालयाने दिलेल्या सूचनेप्रमाणे लाभार्थ्याचे वडील अवधूतराव नरवाडे यांनी ऋतिक याची सर्व कागदपत्रे नगरपंचायत कार्यालयात दिले त्यामध्ये 100% अपंगत्व असल्याचं प्रमाणपत्र मध्यवर्ती बँक पासबुक झेरॉक्स आधार कार्ड झेरॉक्स व त्यांनी अनेक वेळा नगरपंचायत कार्यालयाच्या चकरा मारल्या व यामुळे त्यांची प्रचंड प्रमाणात पायपीठ झाली व त्यांची रोजमजुरी पडून त्यांना आर्थिक नुकसान व त्यांना उडवा उडवीची उत्तरे यावेळी नगरपंचायत कर्मचाऱ्यांकडून देण्यात आली व मानसिक त्रास



झाला या त्रासाला कंटाळून त्यांनी आज दिनांक ३०/१२/२०२५ रोजी नगरपंचायत कार्यालयाला निवेदनाद्वारे इशारा दिला की निधी जमा करा अन्यथा मला आमरण उपोषण करावे लागेल व यासोबत इतरही लाभार्थ्यांचा राहिलेला निधी त्यांच्या खात्यात जमा करण्यात यावा ही मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी भारतीय जनता पक्ष शहर उपाध्यक्ष महागांव विवेक राजेंद्र नरवाडे व अवधूत विश्वनाथ नरवाडे उपस्थित होते.

## पनवेल महानगरपालिका निवडणुकीत नालकोल अपक्ष म्हणून निवडणूक रिंगणात

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी :** गेल्या अनेक वर्षांपासून सर्व सामान्य नागरिकांच्या अडीअडचणीसह,शासकीय कार्यालयातील विविध कामे,तात्काळ मार्गी लावून मदतीचा हात पुढे करत पैशाचा कसलाही मोह न ठेवता,त्याची कामे मार्गी लावण्यासाठी झटणाऱ्या युवकाने पनवेल महानगरपालिका निवडणुकीत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला असून सर्व सामान्याच्या अडचणी सोडवण्यासाठी ही निवडणुक लढवण्याचा मानस व्यक्त केला आहे. आष्टी तालुक्यातील रूईनालकोल येथील ३७ वर्षीय युवक अमोल रामदास नालकोल हा गेली अनेक वर्षापासून पनवेल येथे वास्तव्यास आहे.पनवेल येथील प्रभाग क्रमांक १६ (ड)



मध्ये व परीसरातील लोकांचे शासकीय कामे, त्याच बरोबर आठ हजार रिक्षाचे परमीट, दवाखान्यातील रुग्णांची मदत,पोलीस ठाण्यात गेलेले वाद विवाद समन्वय साधून मिटवणे,यासह अनेक कामे करतात. मराठा आरक्षण मोर्चा काळात मराठा बांधवांसाठी पनवेल येथे सेवा केली.यासह अनेक कामे ते स्वताच्या कामातून वेळ काढून करतात. त्यानी पनवेल महानगरपालिकेत अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.ही निवडणूक फक्त सर्व सामान्य नागरिकांची सेवा करण्यासाठी लढायची आहे.पैशासाठी नव्हे तर लोकांची सेवा करण्यासाठी मी आपल्या घरातील सदस्य म्हणून निवडणूक रिंगणात आहे.मला मायबाप मतदारांनी मतदानरूपी आशिर्वाद देऊन सेवा करण्याची संधी द्यावी. असा मानस अमोल नालकोल यांनी बोलून दाखविला आहे.

## रायगड जिल्हा वैश्यसमाज महिला संघातर्फे साहस संस्कार शिबिर २०२५ यशस्वी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर :** रायगड जिल्हा वैश्यसमाज महिला संघ यांच्या वतीने आयोजित साहस संस्कार शिबिर २०२५ (वर्ष तृतीय) हा उपक्रम अत्यंत उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडला. या शिबिराचे आयोजन शामल सुंदर आंग्रे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले असून मीरा मनोज आंग्रे (अध्यक्ष, सांस्कृतिक कमिटी, महिला संघ) यांच्या पुढाकारातून या उपक्रमास विशेष चालना मिळाली. या शिबिरासाठी हर्षला योगेश तांबोळी



(उपाध्यक्ष, रायगड जिल्हा महिला संघ), अर्चना आशिष झिंजे (उपाध्यक्ष, संस्कृती कमिटी), प्रगती प्रदीप दलाल (अध्यक्ष, क्रीडा समिती), रसिका महाजन तसेच सर्व महिला कमिटी सदस्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक योगदान दिले.

जवळपास ६० मुलांसाठी दोन दिवसांचे साहस संस्कार शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात मुलांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी बक्षीस वितरण कार्यक्रम देखील पार पडला. शिबिरादरम्यान मुलांसाठी उत्तम निवास व्यवस्था, पौष्टिक भोजन, योगाभ्यास, उच्च प्रशिक्षित प्रशिक्षकांकडून मार्गदर्शन, मैदानी खेळांचे महत्त्व, बुके बनवणे, नृत्य कार्यक्रम, प्रश्नमंजुषा, मनाचे श्लोक, तसेच भगवद्गीतेची माहिती अशा बहुआयामी कार्यक्रमांचा समावेश होता.

या उपक्रमाच्या माध्यमातून मुलांना मोबाईलच्या आभासी विश्वातून बाहेर काढून संस्कार, साहस, शिस्त व संघभावना यांचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवातून समजावून देण्यात आले. समाजातील मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी असा उपक्रम राबविल्याबद्दल उपस्थित पालक व समाजबांधवांकडून आयोजकांचे विशेष कौतुक करण्यात आले.



# तलाठी संवर्गाच्या न्याय्य मागण्यांकडे प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष

## एक दिवसीय धरणे आंदोलन; 6 जानेवारीपासून बेमुदत सामूहिक रजेचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी/महेश पेन्दोर :** यवतमाळ जिल्ह्यातील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) संवर्गाच्या आर्थिक व सेवाविषयक न्याय्य मागण्यांकडे जिल्हा प्रशासनाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप विदर्भ पटवारी संघाने केला आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून सातत्याने पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून केवळ आश्वासनांची बोळवण सुरू असून, तब्बल १० ते १२ वेळा निवेदने सादर करूनही एकही मागणी प्रत्यक्षात मार्गी न लागल्याने तलाठी संवर्गात तीव्र असंतोष पसरला आहे.

या प्रशासनाच्या उदासीन भूमिकेच्या निषेधार्थ 31 डिसेंबर 2025 रोजी घाटंजी तहसील कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी ग्राम महसूल अधिकाऱ्यांमार्फत DSC प्रशासनाकडे जमा करण्यात आले.

याच पार्श्वभूमीवर दि. 2 जानेवारी 2026 रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे



आंदोलन करण्यात येणार असून, त्यानंतरही मागण्या मान्य न झाल्यास दि. 6 जानेवारी 2026 पासून बेमुदत सामूहिक रजेवर जाण्याचा इशारा तलाठी संघटनेने दिला आहे.

१५ वर्षांपासून सेवाज्येष्ठता अद्यावत नाही!

तलाठी संवर्गाची एकत्रित सेवाज्येष्ठता यादी तब्बल पंधरा वर्षांपासून अद्यावत करण्यात आलेली नाही. त्यामुळे पदोन्नती, वेतननिश्चिती, बदली प्रक्रियेत गंभीर अन्याय होत असून, प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याची भावना कर्मचाऱ्यांमध्ये आहे.

■ तलाठी संवर्गाच्या प्रमुख मागण्यामंडळ अधिकारी पदोन्नती तात्काळ देणे

■ कालबाह्य लॅपटॉप व प्रिंटर बदलणे

■ विनंती बदली प्रक्रिया पूर्ण करणे

■ अतिवृष्टी व दुष्काळी अनुदान वितरणावर 0.25% प्रशासकीय मेहनताना

■ भाड्याच्या तलाठी कार्यालयांना नियमित भाडे

■ वार्षिक गोपनीय अहवालाची प्रत देणे

■ वेतन निश्चिती व अतिरिक्त प्रभाराचा मोबदला

■ आदिवासी प्रोत्साहन भत्ता

■ कार्यालयांसाठी फर्निचर व मूलभूत सुविधा

■ कोतवाल प्रतिनियुक्तीबाबत स्पष्ट धोरण

■ गौण खनिज पथकात संरक्षण

■ विद्युत बिल शासनाने भरणे

■ वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके निकाली काढणे

■ 2053 शिर्षकांतर्गत मिळणारी रक्कम अदा करणे

■ जिल्हाधिकारी कार्यालयातील तलाठी आस्थापनेचा नियमित आढावा

■ कालबद्ध पदोन्नतीसह इतर प्रलंबित मागण्या

आंदोलन चिघळल्यास जबाबदारी प्रशासनाची जिल्हा प्रशासनाने वेळेत सकारात्मक भूमिका घेतली नाही तर आंदोलनाची व्याप्ती व तीव्रता वाढविण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. विदर्भातील ११ही जिल्हे यवतमाळच्या समर्थनार्थ रस्त्यावर उतरतील, आणि त्याची संपूर्ण जबाबदारी जिल्हा प्रशासनाची राहील, असेही संघटनेने ठामपणे सांगितले आहे.

हे आंदोलन विदर्भ पटवारी संघाचे केंद्रीय अध्यक्ष श्री. बाळकृष्ण गाढवे यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाध्यक्ष श्री. भरत पिसे यांच्या नेतृत्वाखाली होत असून, जिल्हा व उपविभागीय पदाधिकारी तसेच जिल्ह्यातील सर्व ग्राम महसूल अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती जिल्हा सचिव श्री. चेतन ठाकरे यांनी दिली.

# विश्वास आणि सुरक्षिततेसाठी मच्छिंद्रनाथ मल्टीस्टेटमध्ये खाते उघडा" :- सोमीनाथ कोल्हे

## मच्छिंद्रनाथ मल्टीस्टेट बँकेच्या २०२६ सालच्या नूतन दिनदर्शिकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस तसेच सौ.प्राजक्ता काकू धस यांच्या मार्गदर्शनाखाली मागील अकरा वर्षांपासून ठेवीदारांचा विश्वास जपणारी मच्छिंद्रनाथ मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, आष्टी ही बँक विश्वासार्हतेचे प्रतीक ठरली आहे. पाटोदा शहरातील नागरिकांनी विश्वास आणि सुरक्षिततेसाठी मच्छिंद्रनाथ मल्टीस्टेट मध्ये मोठ्या प्रमाणात खाते उघडावे, असे आवाहन आमदार सुरेश धस यांचे स्वीय सहाय्यक तसेच पाटोदा पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे यांनी केले. पाटोदा येथील मच्छिंद्रनाथ मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या २०२६ या वर्षाच्या नूतन दिनदर्शिकेचे प्रकाशन बुधवार, दिनांक ३१ डिसेंबर रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडले. या वेळी बोलताना सोमीनाथ कोल्हे म्हणाले



की, मच्छिंद्रनाथ मल्टीस्टेटने स्थापनेपासूनच ग्राहकांचे हित केंद्रस्थानी ठेवून काम केले असून, अनेक संकटग्रस्त ठेवीदारांना योग्य वेळी आधार दिला आहे.

त्या मुळे बँके वरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात पत्रकार ॲड.महेश बेदरे यांनी सांगितले की, आमदार सुरेश धस व सौ.प्राजक्ता काकू धस यांच्या कुशल, कल्पक व दूरदृष्टीपूर्ण मार्गदर्शनाखाली बँकेची वाटचाल यशस्वीपणे सुरू आहे. बीड जिल्ह्यात अनेक मल्टीस्टेट व पतसंस्थांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत असताना, मच्छिंद्रनाथ मल्टीस्टेटने मात्र आपली वेगळी व ठोस विश्वासार्ह ओळख कायम ठेवली आहे. या कार्यक्रमास पाटोदा न्यायालयाचे विधिज्ञ ॲड.सचिन जावळे, नाभिक महासंघाचे तालुकाध्यक्ष जितेंद्र सांगळे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे तालुकाध्यक्ष डॉ.नरेंद्र जावळे, पत्रकार सतीश गर्जे, महेशर शेख, अजीज शेख, सचिन गायकवाड, राहुल सोनवणे, व्यापारी अर्जुन लोहकरे, अभिजीत वराडे, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड.रवींद्र आवटे, ॲड. जाधव, ॲड.एम.एस.पांडव, भागवत भोसले, बापू शेवाळे, बाळासाहेब बन, बँकेचे कर्मचारी जितेंद्र दळवी यांच्या सह असंख्य ग्राहक व नागरिक उपस्थित होते. या वेळी मान्यवरांच्या हस्ते नूतन दिनदर्शिकेचे औपचारिक प्रकाशन करण्यात आले.

# रहेमान सय्यद यांचा गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय आदर्श समाजसेवक पुरस्काराने गौरव

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी/मारुती सत्रे :** कडा येथील सामाजिक कार्यकर्ते रहेमान सय्यदअली सय्यद यांना गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय आदर्श समाजसेवक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सामाजिक क्षेत्रात त्यांनी केलेल्या निस्वार्थ समाजसेवेची दखल घेत त्यांना शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित भगवान महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित रौप्य महोत्सवातील यंदाचा राज्यस्तरीय गंगाई-बाबाजी आर्दश समाजसेवक पुरस्कार आज दि.३१ डिसेंबर २०२५ बुधवार रोजी आष्टी येथे पुरस्कार वितरण सोहळ्यात मा.आ.भिमराव धोंडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी सौ. दमयंतीताई



धोंडे, डॉ.अजय दादा धोंडे,सौ.अक्षताताई धोंडे, नियामत बेग,पत्रकार उत्तम बोडखे, प्रा.वाघ सर,सेवानिवृत्त पीएसआय अन्सार शेख, राजु काका धोंडे, संतोष चव्हाण,कासिम सय्यद, सईद शेख , इम्रान पठाण,नईम शेख ,साद शेख, तसेच पत्रकार बांधवासह आदी मान्यवर उपस्थित होते.

# श्री गजानन महाराजांची पालखी बिबी नगरीतुन संत नगरीकडे प्रस्थान

**दैनिक युवक आधार**

**बिबी वार्ताहर :** बीबी येथील संत गजानन महाराज संस्थानच्या वतीने 'गण गण गणात बोते'च्या गजरात संतनगरी शेगाव येथे 'श्रीं'ची पालखी मार्गस्थ झाली. या पायदळ दिंडीचे हे बारावे वर्ष आहे. परिसरातील भाविकांच्या सहकार्यातून दिंडीचे आयोजन करण्यात येते. ३१डिसेंबर रोजी बीबीनगरीतून 'श्रीं'च्या पालखीचे सकाळी ०९:३०वाजता प्रस्थान झाले. पालखीचे रथपूजन संस्थान विश्वस्त साहेबराव बाबा काटे व सारंगधर महाराज टेके ठाणेदार चंद्रकांत पाटील साहेब व पोलीस कर्मचारी बिबी सरपंच दिपक गुलमोहर, दिलीप बनकर, व गोविंद टेके संदिप बाबुराव चव्हाण बबलु आटोळे विष्णू जोरावर कैलास काकड दिलीप फडके बीबी परिसरातील पत्रकार संघ



,व भागवत आटोळे राजकीय सामाजिक कृषी वैद्यकीय क्षेत्रातील भाविकांच्या हस्ते पूजन करण्यात आले. फराळाची व्यवस्था दिनकर आटोळे यांनी केली. मांडवा येथे पालखीचे स्वागत अशोक बुरकुल यांनी केले ८ जानेवारी २०२५ रोजी पालखी सोहळ्याची सांगता होईल. गोपाल महाराज टेके, रमेश कुरंगळ, विक्रम शेरे, विजय महाराज गव्हाणे, समाधान वायळ, मनोहर अवचार गोटू अवगळे वैभव आंधळे, संजय टेके, पांडुरंग मिसाळ सहभागी झाले आहेत.

# वाई येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये दानपेटीतील पैसे चोरी



**दैनिक युवक आधार**

**जालना-प्रतिनिधी /नामदेव मंडपे मंठा :** मंठा तालुक्यातील वाई येथे विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये अज्ञात व्यक्तीने दानपेटीतील रोख रक्कम काढून घेऊन परत दानपेटी मंदिरात आणून ठेवली अंदाजे रक्कम 20 ते 25 हजार रुपये या दानपेटी मध्ये असेल असे वारकऱ्यांच्या वतीने सांगण्यात येत आहे.

# बेलगाव येथे प्राची चटप चा सत्कार

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/भंडारा :** विद्यार्थ्यांनो प्रतिकूल परिस्थितीचा सामना करून शुन्यातून जग निर्माण करणाऱ्या भारतीय आट्यापाट्या संघाची कर्णधार कु. प्राची चटप चा आदर्श डोळ्यासमोर ठेवणे गरजेचे आहे. असे मत मंगला बहु, शिक्षण संस्थेचे संस्थापक तथा सचिव भजनदास वाढई यांनी केले.ते मंगला बहुउद्देशिय शिक्षण संस्था भिलेवाडा द्वारा संचालित कस्तुरबा गांधी विद्यालय तथा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात प्राची चटप चा सत्कार करतांना बोलत होते.कार्यक्रमाला नाट्य अभिनेता, साहीत्यिक प्रा. डॉ. शिलवंतकुमार मडामे, मंगला बहु, शिक्षण संस्थेचे



संस्थापक तथा सचिव भजनदास वाढई, शाळा समिती सदस्य केवळराम मोटघरे, बेलगाव येथील सरपंचा सौ. रिनाताई तुमसरे, माजी पं. स. सदस्य रामकृष्ण बेदरकर, सेवानिवृत्त शिक्षक ब्रम्हा मोटघरे, सामाजिक कार्यकर्ते विलास केजरकर, पोलीस पाटील रामुजी वाट, सेवानिवृत्त मुख्याध्यापक ए. एच. मेश्राम, स्नेहा मोटघरे, अमरकंठ मारवाडे, रमेश मसराम, प्रमोद मेश्राम, सुमित आग्रे, बेलगाव येथील कस्तुरबा गांधी विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य ओंकार शेन्डे, हिमांशू मसराम, कु. आरती बोरकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. त्यावेळी मान्यवरांच्या हस्ते कस्तुरबा गांधी विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी तथा भारतीय आट्यापाट्या संघाची कर्णधार तथा सुवर्णपदक विजेती कु. प्राची चटप हीचा शाल, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. प्राची चे अभिनंदन मंगला बहु. शि. संस्थेच्या सदस्या शोभाबाई सेलोकर, मांडवी उपसरपंच प्रभाकर सार्वे, बेलगाव उपसरपंच मनोज वळतकर, स्वामी विवेकानंद स्टडी सर्कल, कारधा पोलीस स्टेशनचे सहाय्यक निरिक्षक प्रशांत साखरे, शाळा समिती अध्यक्षा सौ. सुमन वाढई, माटोरा माजी सरपंच किशोर निंबार्ते, मंगला बहु. शिक्षण संस्था भिलेवाडाच्या अध्यक्षा सौ. लताताई बांते, विकास धरमशहारे, सी. टी. ठवकर, नितीन मस्के, एच.डी. संग्रामे, एस. पी. खोब्रागडे, कु. एम. एस. भोंदे, धिरज सरकार, गौरव मेश्राम, कु. प्रिती बचेरे, मंगला राघोर्ते, एस. पी. खोब्रागडे, व्ही. झेड. शेन्डे, आशिष चौधरी, रवि ठवकर, ए. आर. मस्के, आर. आर. नागपूरे, दिनेश नैताम, सुरेश कठाणे, टी. एन. बान्ते, हितेश वाढई, गोवर्धन बडोले, विद्यार्थी-विद्यार्थिनींनी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# पालिका निवडणुकीत बंडखोरांना कसे थोपविणार

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :'** पनवेल महापालिकेच्या निवडणुकीत रंगत निर्माण झाली आहे. भाजपा युतीविरोधात शेकाप महाविकास आघाडी लढताना दिसत आहे. मात्र अनेक ठिकाणी बंडखोरी झाल्याने या बंडखोरांना कसे थोपवणार असा सवाल या निमित्ताने उपस्थित झाला आहे.

कळंबोलीतून भाजप पक्षातर्फे विजया कदम प्रभाग 8 मधून इच्छुक होत्या. मात्र त्यांना उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी 30 डिसेंबर रोजी अपक्ष म्हणून अर्ज भरला तर देवीदास खेडकर यांनी देखील भाजपकडून उमेदवारी मागितली होती. मात्र त्यांना उमेदवारी न मिळाल्याने प्रभाग आठ मधून त्यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला. वंचित बहुजन आघाडीकडून देखील काही ठिकाणी उमेदवार उभे करण्यात आले आहेत. भाजप, शेकाप, शिवसेना आणि इतर पक्षांमध्ये बंडखोरी करण्यात आल्याने आता त्यांचे पक्षश्रेष्ठी उमेदवारांची बंडखोरी कशाप्रकारे थोपवतात हे येत्या काही काळात दिसणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख 2 जानेवारी आहे. या काळात अनेक अपक्ष आणि बंडखोरी केलेल्या उमेदवारांची मनधरणी पक्ष श्रेष्ठींना करावी लागणार आहे.

उमेदवारी अर्ज भरण्याचा 30 डिसेंबर हा शेवटचा दिवस होता. त्यामुळे अनेक उमेदवारांची धावपळ उडाली. उद्धव सेनेतील काही उमेदवारांनी मशालीवर निवडणूक न लढवता महाविकास आघाडीतील शिट्टीवर निवडणूक लढवत आहेत तर आरपीआयचे प्रभाकर कांबळे हे कमळ या निशाणीवर निवडणूक लढवत आहेत

# विद्यापीठात कर्तव्यपूर्ती सोहळा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात शिक्षक, अधिकारी- कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त कर्तव्यपूर्ती सोहळा मंगळवार, दि. ३० डिसेंबर २०२५ रोजी पार पडला. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यात सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना निरोप देण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी भूषविले, कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. राजू हिवसे, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. राजश्री वैष्णव यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. प्रमुख अतिथींच्या हस्ते सेवानिवृत्त श्री. चंद्रशेखर दिगांबर शेळके, श्री राजेंद्र बाबुराव बालपांडे, श्री अनिल जनार्दन बडनखे, श्री राजेश गजाननराव खानोरकर, श्री रमेश उदाराम मेहर यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी सत्कारमूर्ती चंद्रशेखर शेळके, रमेश मेहर आणि राजेश खानोरकर



यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषण करताना अधिष्ठाता डॉ. राजश्री वैष्णव यांनी विद्यापीठ एका कुटुंबाप्रमाणे असून कर्मचारी कधीही परिवारापासून दूर होऊ शकत नाही, असे सांगितले. आरोग्याची काळजी घेत पुढील आयुष्य कुटुंबासोबत आनंदात घालवावे, असे देखील डॉ. वैष्णव म्हणाल्या.

कार्यक्रमाचे संचालन श्री. दीपक घोडमारे यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले. कार्यक्रमाला वित्त व लेखा अधिकारी श्री हरीश पालीवाल सर्व विद्याशाखांचे अधिष्ठाता, शैक्षणिक विभागांचे प्रमुख शिक्षक अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# आजचे रक्षण करा, उद्या सुरक्षित करा, पळस्पे येथे पर्यावरणीय कायदेशीर साक्षरता कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** तालुका विधी सेवा समिती पनवेल, वकील संघटना पनवेल आणि पंचायत समिती पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आजचे रक्षण करा, उद्या सुरक्षित करा या विषयावर आधारित पर्यावरणीय कायदेशीर साक्षरता व समुदाय संरक्षण उपक्रम अंतर्गत जनजागृती कार्यक्रम पळस्पे येथे यशस्वीपणे संपन्न झाला.

हा कार्यक्रम पळस्पे ग्रामपंचायत कार्यालयात पार पडला असून यावेळी जवळपास ११० नागरिकांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रदूषणग्रस्त भागांतील असुरक्षित समुदायांमध्ये पर्यावरणीय कायद्यांविषयी साक्षरता वाढवणे, उच्च प्रदूषण पातळीमुळे निर्माण होणाऱ्या आरोग्यधोक्यांबाबत जनजागृती करणे, प्रदूषणाच्या संपर्कासंदर्भातील गैरसमज दूर करणे तसेच पर्यावरणीय कायद्यांतर्गत उपलब्ध तक्रार निवारण यंत्रणांपर्यंत नागरिकांना पोहोचण्यास मदत करणे, या मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यासोबतच पर्यावरण रक्षणाच्या माध्यमातून सामाजिक व वैयक्तिक पातळीवर विजय कसा साधता येतो, याचे विविध पैलू उदाहरणांसह उपस्थितांसमोर मांडण्यात आले.

कार्यक्रमात पर्यावरण संरक्षणासाठी समुदाय-आधारित व स्वयंसेवी उपाययोजनांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. विशेषतः मुले, वृद्ध व्यक्ती, बाहेरील कामगार, शाळा, अंगणवाडी केंद्रे, बांधकाम स्थळे आणि सार्वजनिक ठिकाणी असे संरक्षणात्मक उपाय राबविल्यास पर्यावरण संरक्षणाच्या लढ्यात प्रभावी यश मिळू शकते, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



गटविकास अधिकारी समीर वाठारकर हे उपस्थित होते. त्यांनी पर्यावरण संरक्षण ही केवळ कायदेशीर जबाबदारी नसून ती एक सामाजिक चळवळ असल्याचे सांगत शाश्वत भविष्यासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता अधोरेखित केली.

प्रमुख वक्त्या ॲड. दिपाली बोहरा यांनी पर्यावरणीय कायद्यांच्या अनुषंगाने मार्गदर्शन करताना प्रत्यक्ष जीवनात आपण कोणकोणत्या गोष्टींमध्ये बदल करून सकारात्मक पर्यावरणीय परिवर्तन घडवून आणू शकतो याबाबत अनेक समर्पक उदाहरणांच्या माध्यमातून सखोल मांडणी केली. दैनंदिन सवयींमधील छोटे बदलही पर्यावरण रक्षणासाठी मोठा सकारात्मक परिणाम घडवू शकतात, याची त्यांनी उपस्थितांना जाणीव करून दिली. कार्यक्रमात पी.एल.व्ही. शैलेश कोंडसकर यांनी कार्यक्रमाच्या एकूण उद्दिष्टांच्या अनुषंगाने पर्यावरण रक्षण, कायदेशीर जागरूकता आणि सामाजिक सहभाग यांच्या माध्यमातून यश व विजय प्राप्त करण्याचे विविध पैलू स्पष्ट केले. कार्यक्रमास रिटेनर ॲड. सुयश कामेरकर, पॅनल ॲड. अंकुश कुळये तसेच वरिष्ठ लिपिक हेमंत आंबेतकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामविकास अधिकारी सुदिन पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले. उपस्थित नागरिकांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देत पर्यावरणीय कायदे व आरोग्य संरक्षणाबाबत माहिती घेतली.

# माजी विद्यार्थ्यांचा ३२ वर्षांनी पुन्हा भरला वर्ग

## शाळेत जुन्या आठवणींना उजाळा देत घेतला स्नेहमिलनाचा आनंद

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/भंडारा :** जनता शिक्षण संस्था व्दारा संचालित बुटी विद्यालय खमारी (बुटी) येथील सन १९९३-१९९४ ला शिकलेल्या १० वी वर्गाच्या बॅचमधील पुनर्मिलन शिक्षक -शिक्षिका व विद्यार्थी- विद्यार्थिनींचा गेट- टुगेदर कार्यक्रमाच्या माध्यमातून एकत्र येऊन बुटी विद्यालय खमारी (बुटी) च्या भव्य परीसरात नुकतेच पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापक यु. बी. गजभिये होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद सदस्य रजनिश बन्सोड, मंडणगाव येथील माजी सरपंच प्रभुजी फेंडर, सेवानिवृत्त शिक्षक एच. एल. रहांगडाले, एस. पी. नाकतोडे, व्हि. टी. बन्सोड, शिक्षिका कांताताई दामले (तिरपुडे), पुष्पा घुटके, रामकृष्ण बेदरकर, रत्नमाला रामटेके, विरेंद्र घुटके, उमाबाई पवनकर, महेंद्र बन्सोड, बुट्टी विद्यालय खमारी येथील लिपिक बाभरे, प्रतिष्ठीत नागरीक किसन ठवकर, सेवानिवृत्त पोलिस कर्मचारी ओमप्रकाश मडामे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

त्यावेळी परिचर धनराज मेश्राम यांनी शाळेची घंटा वाजवताच ३२ वर्षांनंतर जमलेले शिक्षक -शिक्षिका व विद्यार्थी- विद्यार्थीनी रांगेत उभे राहिले. क्रीडा शिक्षक ए. आर. बन्सोड यांनी आडर दिल्यावर राष्ट्रगीताला सुरूवात झाली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रपिता महात्मा गांधी, स्वच्छतेचे पुजारी निष्काम कर्मयोगी संत गाडगे महाराज, स्रिशिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले, महाराष्ट्र दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले. सन १९९३-१९९४ च्या बॅचमधील मृत शिक्षक -शिक्षिका व विद्यार्थी यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. विद्यार्थीनी स्वागत गीताने शिक्षक -शिक्षिका व मान्यवरांचे करण्यात आले.

नंतर सन १९९३-१९९४ च्या बॅचच्या विद्यार्थी- विद्यार्थीनीची हजेरी शिक्षक व्हि. टी. बन्सोड यांनी घेतली



आणि विद्यार्थी दशेत असतांना ज्याप्रमाणे बोलत होते. त्याप्रमाणे हजरसर, आलोसर, हजर गुरूजी, तो मामाच्या गावी गेल्यासर अशाप्रकारे विद्यार्थी बोलत होते. उपस्थित मान्यवरांचा शाल व श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. हृदयाच्या नाजूक कप्प्यात साठवलेल्या आठवणी तब्बल ३२ वर्षांनंतर त्याच ठिकाणी, सौगंड्यांसोबत, वातावरणात उलगडल्या गेल्या. त्यामुळे भावना शब्दांच्याही पलीकडच्या ठरतात. आठवणींची स्पंदने तशीच साठवत निरोप घेताना अनेकांना गहिवरून आले. मित्र मिलाप हा आगळा वेगळा उपक्रम १९९३-९४ बॅचचे मित्र-मैत्रिणी तब्बल ३२ वर्षांनी पाचवी ते दहावी पर्यंतचे काही शिक्षक भेटल्याने या विद्यार्थ्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. बालपण सगळे डोळयांसमोर उभे राहिले. जुन्या आठवणींना उजाळा देत जे सध्या हयात नाहीत त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तसेच दिवंगत विद्यार्थी नरेंद्र बन्सोड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शाळेच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षातील माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी तब्बल ३२ वर्षांनंतर एकत्र येत स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. या स्नेहमेळाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे माजी विद्यार्थ्यांसोबतच त्यांचे लाडके शिक्षक -शिक्षिका ही उपस्थित होते.

त्यावेळी भोजराज मडामे, दिलीप कटणकर, पुष्पा कुथे, तिलोत्तमा घुटके, रत्नमाला बान्ते, रंजना शेंडे विद्यार्थी- विद्यार्थीनी मनोगतात भूतकाळातील आठवणी ताज्या आणि प्रत्येकजण आपल्या हृदयाच्या कप्प्यात साठवून ठेवलेल्या लहान पणीच्या आठवणी तब्बल ३२ वर्षानी शाळेच्या माजी विद्यार्थी -विद्यार्थिनींनी ताज्या केल्या. दूर दूर गेलेले सर्व जण एकमेकांना भेटत होते व सेल्फी काढत होते. उपस्थित मान्यवरांनी विविध मार्मिक उदाहरण देऊन मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास केजरकर व प्रास्ताविक खुशाल शेंडे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार विजय बेदरकर यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वसंता अहिरकर, राकेश मडामे, सुभाष फेंडर, भाऊदास नंदेश्वर, अभिमन कोडापे, शालिक गोमासे, विलास मारवाडे, दिलीप गोटेफोडे, राजू खोब्रागडे, राजेंद्र गजभिये, लालचंद भगत, देवराम मानकर, दुर्वास कोटांगले, योगेश रेहपाडे, अल्का वरकडे, धनराज शेंडे, राजू शनवारे, योगेश आग्रे, दिनेश बन्सोड, मिरा वरकडे, परमानंद थुलकर, गंगाधर नंदूरकर, अंतकला मेश्राम, मंगला शेंडे, कलाबाई केजरकर, वर्षा बागडे, कविता पवनकर, सुनिता बोरकर, देवांगणा किरणापुरे, संजय करवाडे, संध्या बन्सोड, पारस गजभिये, संगिता बांडेबुचे, सविता टेंभुर्णे, सीमा बुरडे, ज्योती बन्सोड, भगवान टेंभुर्णे, मदन बेदरकर, भिका मेश्राम, आशा गोटेफोडे, प्रमोद मेश्राम, लिलावती देशमुख, गणेश पवनकर, इत्यादी विद्यार्थी- विद्यार्थिनींनी सहकार्य केले.

## मावळतीचा निरोप घेता गहिवरली सृष्टी,बघता बघता सूर्य गेला डोंगरा आड प्रभात झाली नववर्षाची नवी सुरुवात

बघता बघता वर्षाच्या शेवटच्या दिवसाची पहाट झाली परत एकदा येणाऱ्या नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी नवे वर्ष नवे संकल्प आले,त्याप्रमाणे झाले गेले सारे विसरून आपण नव्याने सुरुवात करायला हवी. मनात साचलेल्या अगणित गैरसमजुतीची पोतडी सोबत घेऊन नवीन वर्षाचे स्वागत कसे होणार सतत मनाच्या गाभाऱ्यात झालेल्या गोष्टीचा आराखडा तयार करून पुढे जगण्याची इच्छा करणे,चुकीचे ना! मग त्यासाठी नवीन वर्षात नवीन आशा नवी नवी संकल्प करू.

मनात साचलेल्या कुष्टे कुजके विचारांनी कोणाचेही भलं होत नाही,या उलट आपण सर्वांसमवादाचे मार्ग बंद करून घेतो झालेल्या गोष्टी विसरून गेलो असं होत नाही,परंतु त्यांना आठवून जर आपल्याला त्रास होत असेल तर मग त्या आठवणी जाग्या करायच्या नाही ना! कारण साठवून ठेवलेल्या आठवणी तुम्हाला आनंद कमी आणि दुःख जास्त करीत असतात.विसरून जाणे सोपे नाही परंतु अशक्य मात्र मुळीच नाही,हे सर्वस्वी आपल्या वागण्यावर विचारावर आणि कृतीवर अवलंबून असते आपण कसे वागावे हे कोणीही आपल्याला सांगत नाहीत आपण तेच करतो जे आपलं मन आपल्याला करायला भाग पाडत असते आपण मनाचे गुलाम आहोत की आपले मन आपल्या कंट्रोलमध्ये असावे हे पडताळून बघणे गरजेचे आहे सुखदुःखाची मोजणी आयुष्यात प्रत्येक व्यक्ती आपल्या कर्माप्रमाणे भोगतच असतो. तेव्हा झाले गेले विसरून जाणे गरजेचे आहे.तेव्हा आपण आनंदी राहून येणाऱ्या कळाला उत्साहाने साजरे करावे,की आपले दुःख सतत उगाळून दुःखी गोष्टी कष्टी राहून जगावे हा निर्णय आपलाच असतो,नवीन वर्षात स्वतःला आनंदी ठेवण्यासाठी खूप प्रयत्न करणे गरजेचे आहे.दुसऱ्याच्या आनंदात आपल्याला सुद्धा आनंदी होता आले पाहिजे, तेव्हाच खरा आनंद उपभोग उपभोगता येतो.

तुम्हाला माहिती आहे का,आपल्या मनाचा आपल्या शरीराशी घनिष्ठ संबंध आहे, मनासारखे झाले नाही म्हणून नकारात्मक विचार सतत ढवळत बसू नये.याने असेच म्हणले, त्याने तसेच केले,माझी कोणाला गरज नाही,मला कोणी विचारत नाही, लोक काय म्हणतील,काय होईल?असे अनेक नैराश्य जनक प्रश्न मनामध्ये कुरवाळत बसणे, आणि याचाच परिणाम आपले शरीर आणि मन कायम अस्थि राहते. त्यामुळे या नव वर्षात या सर्व गोष्टी सोडून द्यायचे आहेत. जगात कुठेही,कोणतेही आनंदाचे क्षण सांगून येत नाहीत.आपला आनंदी इतरांमध्ये नाहीतर आपल्या जवळच असतो याचा विचार करून आपण आनंदी राहिले पाहिजे,आपण आनंदी तर आपले सभोवताली असलेले सारे जग आनंदी हे साधं आणि सोपं समीकरण लक्षात ठेवलं पाहिजे,न मिळालेले सुख गतकाळात सोसलेले हाल अपेष्टा,झालेला अपेक्षाभंग याची उजळणी करून मन सतत कुठत ठेवण्यापेक्षा येणाऱ्या काळात आनंदाने जगणे फार महत्त्वाचे आहे.नववर्षामुळे आपण आपल्या चुका



सुधारू शकतो आणि जीवनाच्या नव्या उंचीवर पोहोचण्यासाठी नवीन मार्ग शोधून पूर्ण वर्षाचे स्वागत आपल्याला एक सकारात्मक विचारधारा आणि जीवनातील ताण तणाव सोडून आनंदी आणि समाधान मिळवण्याची प्रेरणा देते.

पुढील काळात कसे जगायचे काय निर्णय घ्यायचे यासंबंधी विचारमंथन करण्याची संधीदेते. खरंतर जीवनातील प्रत्येक दिवस हा नवीनच शिकवण घेऊन येतो त्याला हसत मुखाने स्वीकारायचे असते. "सकारात्मकता ही यशाची पहिली पायरी आहे आणि आपले स्वप्न साकार करण्यासाठी झटणे धडपड करणे हे जगण्याचे ध्येय आहे." मागच्या वर्षात स्वप्नभंग झाल्यावर ही नवीन दुसरं स्वप्न बघण्याची हिंमत म्हणजेच जीवन होय. प्रयत्न ही एक आयुष्यातील अशी पायरी आहे.

जिच्या पुढे नशीब सुद्धा हार मानते,आणि त्या प्रयत्नासाठीच नवीन वर्षामध्ये नवीन ध्येय डोळयासमोर ठेवून जे जिद्द आणि ध्येयवादी असतात ते अपयश काय जगाला हरवण्याची ताकद ठेवतात.प्रत्येक माणूस हा सामान्यच असतो पण जो सर्वांपेक्षा काहीतरी वेगळं करतो तोच असामान्य ठरतो.म्हणून जीवन जगताना जगाचा विचार करायचा नसतो कारण जग ज्याच्याकडे काही नाही त्याला हसतं आणि ज्याच्याकडे सर्व काही आहे त्याच्यावर जळतं. खरं तर माणसाच्या जगण्यात चक्रीवादळ यायलाच हवी त्याशिवाय आपल्याला आपल्या क्षमता समजणार नाहीत म्हणून या नवीन वर्षात येणाऱ्या वादळांना येणाऱ्या आव्हानांना तोंड देण्याची हिंमत ठेवा नक्कीच यश मिळेल.कारण स्वतःवर असलेला विश्वास जेव्हा जितका घट्ट होतो तेव्हाच तो विश्वास आपल्या आयुष्यातही परावर्तित होतो,ज्यांचा स्वतःच्या मनगटावर विश्वास असतो,त्यांना दुसऱ्याच्या सामर्थ्याची भीती कधीच वाटत नाही आणि अशा सामर्थ्याला हरवण्याचे धाडस नियती सुद्धा कधी करत नाही, या वर्षात नवीन ध्येय संकल्प करायचेत आपण आपले भविष्य तर बदलू शकत नाही

परंतु आपल्या सवयी बदलू शकता आणि नक्कीच आपल्या सवयी आपलं भविष्य बदलतील,आणि जेव्हा आपल्या आयुष्यात अडचणी येतात तेव्हा दुःखी व्हायचं नाहीये कारण कठोर भूमिका ही फक्त चांगल्याच कलाकारांना दिली जाते. म्हणून नवीन वर्षात दररोज कोणाच्यातरी आनंदाचे कारण बना तुम्हाला मिळणारा आनंद हा तुम्ही दिलेल्या आनंदापेक्षा जास्त असेल.सर्वांनाच एकदा नववर्षाच्या खूप खूप शुभेच्छा.

**श्रीमती सोनवणे सरोजा बालाजी**
**जि.प.प्रा.शाळा महेबुबनगर हणेगाव**

## सामनेरी पब्बज्जा शिबिर समापन समारोह संघदान व भोजनदानाचे आयोजन गुरुवारी

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक/ नागपूर विभाग :** बुद्ध चतु परिसा भिक्खुनी संघ, थायलंड च्यावतीने 22 ते 31 डिसेंबर च्या दरम्यान सामनेरी पब्बज्जा शिबिराचे आयोजन यशस्वीरित्या पार पडले म्हणून भव्य सामनेरी पब्बज्जा शिबिर समापन समारोह संघदान व भोजनदानाचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्मृती संग्रहालय शांतीवन, चिचोली, नागपूर येथे १ जानेवारी रोजी येथे करण्यात आले आहे. तरी समाज बांधवांनी संघदान व भोजनदानाचा लाभ घ्यावा. असे आवाहन संयोजक





गौतम वाहणे यांनी केले केले आहेत. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून भदन्त सत्यानंद महाथेरो, राष्ट्रीय महासचिव, अखिल भारतीय भिक्षु महासंघ तथा याप्रसंगी प्रमुख उपस्थिती मा. गुणवंत देवपारे, उद्योजक, पॅरामिड ग्रुप, नागपूर आणि अध्यक्ष संजय पाटील यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती संग्रहालय शांतीवन चिंचोली येथे केले असून संयोजक मा. धम्मदास मुंदरखे व गौतम वाहणे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## पीपल्स रिपब्लिकन पार्टीचा भाजप महायुतीला जाहीर पाठिंबा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पीपल्स रिपब्लिकन पार्टीने पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी भाजप महायुतीच्या उमेदवारांना आपला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. या पाठिंब्याचे पत्र पीआरपीचे रायगड जिल्हाध्यक्ष सीताराम कांबळे यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे सुपूर्द केले आहे. पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी




खासदार प्रो. जोगेंद्र कवाडे यांच्या आदेशाने पनवेल महानगरपालिका निवडणूक २०२५-२६ करीता भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँगेस, आरपीआय (आठवले गट) महायुतीच्या उमेदवारांना जाहीर पाठिंबा दिला आहे. या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांच्या विजयासाठी पक्षाचे कार्यकर्ते सक्रियपणे काम करतील, असा विश्वास पीआरपीचे रायगड जिल्हाध्यक्ष सीताराम कांबळे यांनी दिला आहे.

## राज्यभर १ ते ३१ जानेवारी दरम्यान 'रस्ता सुरक्षा अभियान'

**मुंबई :** रस्ते अपघातांमध्ये होणारी जीवितहानी कमी करण्यासाठी आणि नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षेविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने राज्यभर 1 ते 31 जानेवारी 2026 या कालावधीत केंद्र सरकारच्या निर्देशानुसार राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिना हे अभियान साजरे करण्यात येणार आहे. यानिमित्ताने संपूर्ण राज्यात विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत परिवहन विभाग, वाहतूक पोलीस विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, शालेय शिक्षण विभाग तसेच इतर संबंधित संस्था व संघटनांच्या सहकार्याने रस्ता सुरक्षिततेसाठी प्रचार, जनजागृती व जनप्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. नागरिक, वाहनचालक, विद्यार्थी आणि सर्व संबंधित घटकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जागरूकता वाढविणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय (एमओरटीएच) यांच्या मार्गदर्शनानुसार या कालावधीत प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा, परिसंवाद, वाहनचालक व शालेय विद्यार्थ्यांसाठी जनजागृती सत्रे, नेत्र तपासणी शिबिर तसेच विविध प्रचारात्मक उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

यावर्षीच्या राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिन्याची संकल्पना 'सडक सुरक्षा – जीवन रक्षा' अशी असून रस्ता सुरक्षा ही प्रत्येकाच्या जीवनरक्षणाशी निगडित आहे, हा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात येणार आहे. राज्यभर राबविण्यात येणाऱ्या या अभियानामुळे रस्ता सुरक्षा नियमांचे पालन वाढेल आणि अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, अशी अशा परिवहन आयुक्त, मुंबई यांनी व्यक्त केली आहे.

## विविध प्रलंबित मागण्यांसाठी ग्राम महसूल अधिकाऱ्यांचे एकदिवसीय कामबंद आंदोलन

### विदर्भ पटवारी संघ, नागपूर जिल्हा शाखा यवतमाळच्या वतीने महागाव तहसीलवर धरणे

**दैनिक युवक आधार**

**मनोज उर्फ एम डी सुरोशे/महागाव (यवतमाळ) :** सेवा-ज्येष्ठता यादी, पदोन्नती व सुविधांबाबत सरकारच्या उदासीनतेवर तीव्र नाराजी विदर्भ पटवारी संघ, नागपूर जिल्हा शाखा यवतमाळ यांच्या वतीने ग्राम महसूल अधिकारी (पटवारी) संवर्गाच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आज महागाव तहसील कार्यालयाच्या प्रांगणात एकदिवसीय कामबंद धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात तालुक्यातील ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून शासनाच्या उदासीन धोरणाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. या आंदोलनातील प्रमुख मागण्यांमध्ये ग्राम



महसूल अधिकारी संवर्गाची एकत्रित सेवा-ज्येष्ठता यादी तातडीने प्रसिद्ध करणे, तसेच ग्राम महसूल अधिकारी संवर्गाला मंडळ अधिकारी वर्गात तात्काळ पदोन्नती देणे या मागण्यांचा समावेश आहे. अनेक वर्षांपासून या विषयावर केवळ आश्वासने दिली जात असून प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला.याशिवाय, डिजिटल कामकाजाच्या वाढत्या जबाबदाऱ्या लक्षात घेता प्रत्येक ग्राम महसूल अधिकाऱ्यास सनवर लॅपटॉप, स्कॅनर व प्रिंटर त्वरित उपलब्ध करून देण्यात यावेत, अशीही ठाम मागणी करण्यात आली. आवश्यक साधनसामग्री नसताना महसूल कामकाज पार पाडणे कठीण होत असल्याने अधिकारी मानसिक व शारीरिक तणावाखाली काम करीत असल्याचे आंदोलकांनी सांगितले.तसेच कालबद्ध पदोन्नतीची अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित असून ती तातडीने निकाली काढावीत, तसेच ग्राम महसूल अधिकारी संवर्गाच्या इतर प्रलंबित सेवाविषयक व न्याय्य मागण्या शासनाने तत्काळ मान्य कराव्यात, अशी मागणी आंदोलनातून करण्यात आली.या धरणे आंदोलनात शेख मुख्तार, विनोद ढोणे, दीपक दिवेकर, संजय धुळे, अनिल खडसे, एन.एच. मनवर, पी.एम. लव्हाळे, संदीप जाधव, किरण राठोड, एस.एच. राठोड, एच.डी. कदम, एस.व्ही. रायपूरकर, एच.डी. खोकले, टी.बी. आत्राम, एस.बी. बोईनवाड, पी.पी. देशमुख, जी.एस. भगत, पी.डी. हातमोडे, पी.जे.ए.एम.बोकसे,जी, व्ही . तिडके ,निवल ,आर.एस.ठेगे, ज्ञानेश्वर चव्हाण ,यांच्यासह तालुक्यातील व जिल्ह्यातील अनेक पटवारी संघाचे सदस्य उपस्थित होते.आंदोलकांनी स्पष्ट इशारा दिला की, जर शासनाने व महसूल विभागाने या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही, तर येत्या काळात आंदोलनाची तीव्रता वाढवून राज्यव्यापी आंदोलन छेडले जाईल. एकदिवसीय कामबंद आंदोलनामुळे काही काळ महसूल कामकाजावर परिणाम झाला असला, तरी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी हा संघर्ष अपरिहार्य असल्याचे आंदोलकांनी यावेळी ठामपणे सांगितले.